


म. ग्रं. सं. ठाणे
काव्य
क्र. २०६८
५९९९
REFBK-0011973
REFBK-0011973

[illegible]
૭૬૬૫૮
30/3/57.
[illegible]
૨૦૬૮

REFBK-0011973

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
नवुक्रम ...... दि: ......
क्रमांक ...... नोंद दि ......

# सा द

वसंत वैद्य

-: प्रकाशक :-
वसंत वैद्य,
' निवारा '
घंटाळी रस्ता, नौपाडा,
ठाणें.

* * *

सर्व हक्क स्वाधीन

* * *

-: मुखपृष्ठ :-
शांताराम राऊत

* * *

प्रथमावृत्ति
१९६१

* * *

-: मुद्रक :-
गोपाळ धोंडो फडके,
अरुणोदय छापखाना,
ठाणें.

* * *

मूल्य रु. ४

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रास्ताविक ( श्री. वि. स. खांडेकर ) | | १ ते २४ |
| **कविता** | | |
| झरणी | १९५६ | १ |
| सुस्त झोंपली | १९५३ | ८ |
| अनर्थ | १९५५ | ९ |
| पाय शोधीत निघाले | १९५० | ११ |
| लावणी | १९३९ | १३ |
| सिम्नल | १९३९ | १४ |
| बघूं नकोस वळून | १९३८ | १९ |
| गेलीस आल्या पाउलीं | १९३७ | २० |
| कोंकणचा राजा झिम्मा खेळतो | १९५७ | २१ |
| धन्य जाह्लें माझें जगणें | १९६० | ३६ |
| रेडा आणि ज्ञानेश्वर | १९५१ | ३८ |
| अंगाई | १९४१ | ३९ |
| प्रबोधन | १९३८ | ४० |

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| भास्करा | १९५८ | ४१ |
| द्वंद्व | १९५८ | ४२ |
| अट्टाहास | १९५६ | ४७ |
| राजा श्रियाळ | १९५४ | ४९ |
| दिवाळी | १९४० | ६९ |
| करूंया नवीं जगें निर्माण | १९४२ | ७० |
| जरि असलें आव्हान महान् | १९५३ | ७२ |
| कचरा | १९५३ | ७४ |
| आड | १९५३ | ७८ |
| हींच तीं पाउलें | १९५२ | ८१ |
| रे करांनो माझिया | १९४९ | ८३ |
| आला सौदागर सौदागर | १९४९ | ८४ |
| अश्रुंनो व्हा चालते | १९४९ | ८६ |
| वजन यंत्र | १९४८ | ८७ |
| आपुलीं हांकारा तारवें | १९४८ | ९३ |
| पाजळुं दीप अनंत | १९४४ | ९४ |
| हवन | १९४३ | ९६ |
| विषप्राशन | १९४३ | ९७ |
| उंबरा | १९४३ | ९८ |
| टाळें लोखंडी | १९४२ | १०० |
| बसुन विमानांत (१) | १९४० | १०४ |
| बसुन विमानांत (२) | १९४० | १०६ |
| भूक | १९३८ | १०८ |
| अस्थिदेह | १९३८ | ११० |
| नंगा पर्वतावर मोहीम | १९४० | ११२ |
| गस्तवाले होशियार | १९४५ | ११८ |
| चालला यज्ञ | १९६१ | १२० |

# प्रास्ताविक

श्री. वसंतराव वैद्य यांचा पहिला काव्य संग्रह 'बहर' १९३६ सालीं प्रसिद्ध झाला. त्यानंतर दोन तपांनीं 'साद' हा दुसरा संग्रह घेऊन ते रसिकांच्या भेटीला येत आहेत. गद्य लेखकाचा पाळणा कवीच्या पाळण्यापेक्षां अनेक पटींनीं नियमित असतो. कित्येक गद्य लेखकांचे वार्षिक अथवा षण्मासिक पाळणे तारीख न चुकतां हलत राहतात! त्यामुळें वैद्यांच्या दोन काव्य-संग्रहांमध्यें एका पिढीचें अंतर पडलेलें पाहून अनेकांना आश्चर्य वाटेल. मध्यंतरी त्यांची प्रतिभा मुकी झाली होती कीं रुसून पतीशीं अबोला धरणाऱ्या मानिनी-प्रमाणें तिनें कवीशीं अबोला धरला होता, अशी शंकाहि कांहींच्या मनांत येईल. पण खरोखर तसें कांहींच घडलेलें नाहीं. वैद्यांची काव्योपासना अखंड सुरू आहे हें 'साद' मधल्या कवितांच्या रचना कालावरून दिसून येईल. गेल्या वीस वर्षांत वैद्यांनीं विविध वेळीं लिहिलेल्या कविता या संग्रहांत समाविष्ट झाल्या आहेत. मात्र ही काव्योपासना एखाद्या मंदिराच्या कोपऱ्यांत जळत राहणाऱ्या उदबत्तीप्रमाणें आहे. आपल्या सुगंधाच्या चिमुकल्या वलयांत ती दंग आहे.

'साद' हा वैद्यांचा प्रस्तुत संग्रह रसिकांपुढें येण्याला जो दीर्घ कालावधि लोटला आहे, त्याला माझ्या परीनें मीहि हातभार लावला आहे! गेलीं तीन चार वर्षे त्यांचें हस्तलिखित माझ्यापाशीं आहे. प्रास्ताविक सवडीनें मनासारखें लिहावयाचें म्हणून आठवण राहील अशा ठिकाणीं मी हें हस्तलिखित ठेवीत आलों आहे. अधून मधून तें उघडून त्यांतल्या कविताहि मीं वाचल्या आहेत. पण त्या त्या वेळीं मन कांहीं कामांनीं किंवा काळज्यांनीं व्यग्र असल्यामुळें, गडबडीनें प्रस्तावना लिहायची नाहीं म्हणून मी तें पुनः बाजूला ठेवलें आहे. परंतु माझ्या बाबतींत सवड ही मृगजळासारखी गोष्ट होऊन बसली आहे. एखादें काम सवडीनें करावें म्हणून जों जों मी ती शोधूं लागतों, तों तों ती माझ्यापासून दूर पळत सुटते! प्रत्येक मनुष्याला जन्माला घालतांना ब्रह्मदेव त्याच्याबरोबर एक शब्दकोश देतो आणि त्या मनुष्याला ज्या गोष्टी कधींहि मिळूं नयेत अशी त्या चतुराननाची इच्छा असते, त्या सूचित करणारे शब्दच तो त्या कोशांत ठेवीत नाहीं अशी अनुभवांतीं माझी समजूत होऊन बसली आहे. त्यामुळें 'सवड', 'फुरसत' इत्यादि मंडळींचा आणि माझी कधींच गांठ पडत नाहीं. तें कांहींहि असो! वैद्यांचें 'साद' चें हस्तलिखित माझ्याकडे आल्या नंतरच्या काळांत एकभाषिक महाराष्ट्राची प्रचंड चळवळ होऊन तो निर्माण होण्याची घोषणासुद्धां झाली. पण माझा हात कांहीं प्रस्तावनेला लागला नाहीं!

अधून मधून या गोष्टीची टोंचणी मला लागे. मग मी वैद्यांना पत्र पाठवून 'लवकरच हें काम करतों' असें आश्वासन देई. तेहि 'तुमच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्याची व कौटुंबिक अडचणींची मला पूर्ण जाणीव आहे. तुम्हीं प्रस्तावना तुमच्या सवडीनें, अगदीं लहर लागेल तेव्हां लिहावी' असें मोठ्या गोड शब्दांनीं कळवीत. त्यांच्या या गोडपणाचा परिणाम एवढाच झाला कीं, असल्याच प्रकारचीं लहान मोठीं कामें मध्येंच गळयात येऊन पडलीं, धडपडत तीं पुरीं करावीं लागलीं, आणि आधीं स्वीकारलेलें हें काम मात्र रेंगाळत मागें राहिलें. हें उदाहरण देऊन अतिरिक्त सज्जनपणामुळें या जगांत

तोटाच होतो असा अर्थांतरन्यास त्यांतून कुणी काढला तर निदान मला तरी तो खोटा वाटणार नाहीं. कवि लहरी असतात, स्वतःच्या काव्याविषयीं त्यांच्या लोकविलक्षण कल्पना असतात, ते आपल्या काव्याचे घोडें केव्हां, कुठें आणि कसें पुढें दामटतील याचा नेम नाहीं, वगैरे गोष्टी माझ्या लेखीं केवळ ऐकीव नाहींत. त्यांचा अनुभव गेल्या चाळीस वर्षांत मी अनेकदां घेतला आहे. पण आत्मपूजा, लहरीपणा किंवा प्रसिद्धीची लग्नघाई हीं जर कवित्वाचीं लक्षणें असतील तर वैद्य कवि नाहींत असेंच म्हणावें लागेल.

गेल्या तीन-चार वर्षांत वसंतरावांशीं प्रस्तावनेचे अनेक वायदे मी केले. कधीं पंधरवड्याचे, कधीं महिन्याचे! पण प्रत्येक वेळीं वचनभंगाचें पाप मात्र माझ्या पदरांत पडलें! या काळांत आठ पंधरा दिवसांची निर्वेध सवड मला कधींच मिळाली नाहीं. त्यामुळें हें काम तसेंच पडून राहिलें, आजहि प्रकृतीच्या नाना प्रकारच्या प्रतिकूलतेंतच तें मी पार पाडीत आहे. या बाबतींत माझ्याकडून जो मनस्ताप देणारा विलंब झाला त्याबद्दल मी वैद्यांची मनःपूर्वक क्षमा मागतों आणि 'साद' मधल्या गोडव्याकडे अवधान देण्याविषयीं वाचकांना विनवितों.

केशवसुतांपासून आतांपर्यंतचा आधुनिक मराठी कवितेचा इतिहास पाहिला तर सामान्यतः एकेक दशक विशिष्ट प्रवृत्तीच्या आणि गुणांच्या एक-दोन प्रमुख कवींनीं अंकित केलें आहे असें दिसून येईल. १९०० तें १९१० या दशकावर टिळक - केशवसुतांचा पगडा होता. पुढें १९१० ते १९२० हें दशक बालकवि व गोविंदाग्रज यांच्या प्रतिभेनें प्रभावित झालें. १९२० ते १९२५ हा सामान्यतः संधिकाल म्हणतां येईल. बालकवि व गोविंदाग्रज अगदीं अकालीं अस्त पावले होते. रविकिरण मंडळाच्या विविध गुणांचा व तांब्यांच्या प्रफुल्लित प्रतिभेचा रसिकांना अद्यापि परिचय व्हावयाचा होता. या संधिकाळांत काव्यविहारी, चिरकुड, अज्ञातवासी, नेरूरकर, केशवकुमार वगैरे अनेक कवि उदय पावले. १९२५ ते १९३५ हें दशक रविकिरण मंडळाच्या

कर्तृत्वाचें व तांब्यांच्या लोकप्रियतेचें होतें. वैद्यांनीं काव्यलेखनाला प्रारंभ केला तो या दशकांतच. पुष्कळ अंशीं रविकिरण-मंडळाच्या काव्यानें प्रभावित होऊन !

'वहर' या त्यांच्या पहिल्या काव्य-संग्रहामधल्या बहुतेक कविता १९३३-३५ या वर्षांत लिहिल्या गेल्या आहेत. हीं वर्षं रविकिरण मंडळाच्या लोकप्रियतेच्या उधाण भरतीचीं होतीं. यशवंत व माधव ज्यूलियन यांच्या काव्यानें रंगून गेलेल्या मध्यम वर्गाच्या रसिकतेच्या आविष्काराचे ते दिवस होते. त्यावेळीं यशवंतांच्या काव्य गायनाचे अनेक कार्यक्रम एकाच दिवशीं मुंबईच्या परिसरांत निरनिराळ्या ठिकाणीं होत असत. त्या सर्व कार्यक्रमांना हजर राहतांना आपली कशी धांवपळ होत असे याचें वर्णन वैद्यांनीं एकदां बोलतां बोलतां माझ्यापाशीं केलें होतें. मींहि त्या काव्यगायनाची धुंदी अनुभवली आहे. दादरच्या वनमाळी हॉलमध्यें सकाळीं नऊ वाजतां यशवंतांचें काव्यगायन असो, पुण्याच्या ट्रेनिंग कॉलजमध्यें तें रात्रीं नऊ वाजतां असो अथवा सोलापुराहून तीस मैल दूर असलेल्या हिप्परग्यासारख्या खेड्यांत मध्यरात्रीनंतर तो कार्यक्रम सुरू होवो, सर्वत्र काव्यलोलुप श्रोत्यांची कशी गर्दी होत असे आणि ही गर्दी कवितेमागून कविता ऐकत असतांना कशी धुंद होउन जाई, हें मी स्वतः पाहिलें आहे. वैद्यांच्या उमलत्या कविमनाला त्यानें किती भुरळ घातली असेल याची कुणालाहि कल्पना करतां येईल. 'वहर' मधल्या कविता आज चाळून पाहिल्या तर वृत्त, विषय, विचारसरणी इत्यादि अनेक गोष्टींत रविकिरण मंडळानें वैद्यांना किती आकृष्ट केलें होतें हे सहज लक्षांत येतें.

यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. महावृक्षाच्या सावटांत लहान वृक्ष-वेलींचा विकास खुरटतो हें खरें आहे. कसलीहि कला केवळ अनुकरणशील राहिली तर तीहि अशीच प्राणशून्य होत जात. पण त्याचबरोबर उदयोन्मुख कलावंताला उमेदवारीच्या काळांत पूर्वसूरींच्या छायेंतच वाढणें प्राप्त असतें. पंख फुटेपर्यंत पिलाला घरट्याला चिकटून राहावेंच लागतें. ते फुटले म्हणजे

त्याच्या संचाराला अनंत आकाश मोकळें होतें. तसेंच हें आहे. प्रारंभीं श्रीपाद कृष्णांच्या छायेंत वाढूनहि गडकऱ्यांच्या प्रतिभेनें पुढें केलेलीं उंच उड्डाणें हें याचें आपल्याकडलें उत्तम उदाहरण आहे.

रविकिरण-मंडळाच्या संस्कारांनीं प्रभावित झालेले वैद्यांसारखे अनेक कवि १९३०–३५ नंतरच्या दशकांत पुढें आले. सोपानदेव चौधरी, संजीवनी मराठे, वि. म. कुलकर्णी, शांता शेळके हीं त्यांतलीं कांहीं नांवें. १९३५ ते ४५ हें दशक कुसुमाग्रज व बोरकर यांच्या प्रतिभाविलासानें उजळलें. या दशकाच्या शेवटीं जिला आपण नवकाव्य म्हणतों ( आतां वस्तुतः ही कविता कोणत्याच दृष्टीनें नवी राहिलेली नाहीं. तिला नवी म्हणणें म्हणजे एखाद्या तरुणीला लहानपणींच्या बेबी या नांवानें हांक मारण्यासारखेंच आहे. ) ती कविता उदयाला आली. पु. शि. रेगे व मर्ढेकर हे तिचे प्रमुख शिल्पकार. आतां त्यांचा वारसा बापट–करंदीकरांच्याकडे आला आहे.

रविकिरण मंडळाच्या उत्कर्षाच्या काळीं कविता लिहूं लागलेले वैद्य, विंदा करंदीकरांची कारकीर्द गाजत असतांनाहि आपल्या पद्धतीनें कविता लिहीत राहिले आहेत. ते जुन्या परंपरेच्या जाळ्यांत अडकून पडले नाहींत किंवा नव्या प्रवाहांत वाहून गेले नाहींत.

काव्याच्या जोडीनें वैद्यांनीं थोडेसें गद्यलेखनहि केलें आहे. 'जिरेटोप' नांवाची त्यांची एक ऐतिहासिक एकांकिका प्रसिद्ध झाली आहे. त्यांनीं लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार हाताळला आहे. नवसाक्षरांकरतां लिहिलेल्या त्यांच्या ' पेरणी ' या पुस्तकाला सरकारी पारितोषिक मिळालें आहे. असें असलें तरी वैद्यांचें मन हें मूलतः कविमन आहे. तें गद्य लेखकाचें बहिर्मुख, चिकित्सक किंवा विचारप्रवण मन नाहीं. कल्पना आणि भावना यांचें या मनाला अधिक आकर्षण आहे. हें कविमन जसें एका बाजूनें निरनिराळ्या दशकांत निर्माण होणाऱ्या कवितेची यथाशक्ति साथ करीत आलें आहे, तसें तें स्वतःच्या

काळजाला जाऊन भिडणाऱ्या किंवा तिथें सतत राहणाऱ्या लहानमोठ्या दुःखांचा आणि स्वतःच्या हृदयाला क्षणभर पुलकित करणाऱ्या चिमुकल्या सुखांचा अविष्कारहि करीत आलें आहे.

वैद्यांच्या कविमनाचीं वैशिष्ट्यें सहज लक्षांत येण्याजोगीं आहेत. चमत्कृतिजनक कल्पनेकडे त्यांचा ओढा आहे. ' बहर ' मधल्या ' पृथ्वीचा पाळणा ' या कवितेंतल्या

*रंगीबेरंगी चिरडचा बहुमोल*
*वसंतदादा तुजसी आणील*
*इंद्रधनूचे गजरे वेणीला*
*मेघांना सांगूं आणावयाला*

या चार ओळी वाचल्या तरी कल्पनेशीं क्रीडा करीत त्यांची कविता कशी फुलत जाते याची कल्पना येईल. 'साद' मधल्या 'सिग्नल' किंवा ' रे करांनो माझिया ' यांसारख्या कवितांत हें वैशिष्ट्य मोठ्या चमकदार आणि रसपोषक रीतीनें प्रगट झालें आहे.

प्रेमगीतें कोण गात नाहीं ? वैद्यहि तीं गातात. आपल्या अशा प्रकारच्या गीतांना ते जी नावीन्याची डूब देतात ती आकर्षक असते. ' बहर ' मधल्या ' प्रतीक्षा ' कवितेंत नुकतेंच लग्न झालेली एक तरुणी पतिराजांच्या स्वागताकरतां भावासह स्टेशनवर जाते. गाडीला उशीर झाल्यामुळें ती बेचैन होते. माणसाला पळ युगासारखें होतें तें अशा वेळींच ! रोज वेळेवर येणाऱ्या गाडीनें आजच आपलें वैर साधावें म्हणून ती चिडते. या अधीर मनःस्थितींत ती म्हणते,

*तारांचे खांब उभे उंच दिवे येथें*
*बसुनी जर त्यावर मज पाहाया मिळतें*
*तर दिसती गाडी मज येतांना दूरी*

'न्याहारिचा वकुत' सारख्या यशवंतांच्या कवितेनें १९३० च्या आगेमागें ग्रामीण गीतांची आवड कवींमध्यें निर्माण केली. 'मोटेवरील गाणें' 'ओढ' अशा प्रकारच्या त्या पद्धतीच्या कविता 'बहर' मध्यें आढळतात, पण कधीं अनुकरण म्हणून तर कधीं वातावरणांत घुमणाऱ्या सुरांनीं कल्पकतेला चालना मिळाली म्हणून वैद्यांनीं प्रारंभीं असें विविध काव्यलेखन केलें असलें तरी त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाचें जें दर्शन होतें, तें 'शांतिपूजन' 'देव' 'धूलिकण', 'मजूर' अशा कवितांतच 'साद'मधें त्यांच्या अशा प्रकारच्या कविता विपुल आढळतात याचें कारण हेंच आहे.

अशा कवितांना सामाजिक म्हणण्याचा प्रघात आहे. त्यांत गैर असें कांहींच नाहीं. पण कला असामाजिक असते व ती तशी असली तरच श्रेष्ठ ठरते, असा अट्टाहास आपल्याकडे गेल्या पंधरा वर्षांत सुरू झालेला आहे. हुकमेहुकूम तयार केलेल्या चित्रपटांच्या गाण्यांत ज्यांना काव्य आढळतें, त्यांनींच सामाजिक काव्य म्हणजे पद्यस्वरूपांत केलेला एखाद्या प्रचलित गोष्टीचा पुरस्कार अथवा तिरस्कार असें सोईस्कर समीकरण मांडावें हा विनोदाचाच एक प्रकार आहे.

काव्यापासून शिल्पापर्यंत सर्व ललितकला एकाच मापानें मोजणें, सर्वांना सारखेच नियम लागू पडतात असें गृहीत धरणें आणि त्यांतून श्रेष्ठ साहित्यकला असामाजिक असते असा सिद्धांत काढणें ही मोठी चूक आहे. साहित्य ही मूलतः संमिश्र कला आहे. या संमिश्र कलेंतहि काव्य, कथा व कादंबरी हे तीन भिन्न प्रकार पाहिले तरी काव्यापेक्षां कथेंत व कथेपेक्षां कादंबरींत कलावंतांची सामाजिक जाणीव अधिक स्पष्टपणें प्रगट होणें अपरिहार्य आहे, असें दिसून येईल. ललित साहित्यांत सदैव सामाजिक जाणीव प्रगट झाली पाहिजे हा हट्ट जितका एकांगी, तितकाच काव्य, कथा इत्यादि ललित-साहित्य सामाजिकतेच्या स्पर्शानें विटाळतां कामा नये हा अट्टाहासहि एकांगी आहे. 'अशी असावी कविता फिरून । तशी नसावी कविता म्हणून । सांगावया कोण तुम्ही कवीला ?। अहांत मोठे पुसतों तुम्हांला ।' हें विचारणाऱ्या

केशवसुतांनीं जी सामाजिक कविता लिहिली ती काय अंतःप्रेरणेवांचून ? केवळ पद्यरचनेच्या हौसेकरितां ? निव्वळ सामाजिक सुधारणेच्या समर्थनासाठीं ? 'झपूर्झा' आणि 'हरपलें श्रेय' लिहितांना केशवसुत कवि होते आणि 'गोफण' व 'नवा शिपाई' लिहितांना ते कवि नव्हते, असें म्हणणें हास्यास्पद होईल. काव्यविषय कोणताहि असो. तो कवीच्या जिव्हारीं जाऊन भिडला पाहिजे. त्याचें मन त्या अनुभवानें फुलें पाहिजे, द्रवलें पाहिजे. एखाद्या सुगंधाप्रमाणें ती अनुभूति आविष्कृत झाली पाहिजे. भगीरथानें स्वर्गातली गंगा जशी दग्ध पूर्वजांच्या उद्धाराकरितां पाताळांत नेली, तसा उत्कट भावना, उज्ज्वल कल्पना आणि अपूर्व भाषाप्रभुत्व यांचा संगम ज्याच्या ठिकाणीं झाला आहे तो कवि सामान्यालाहि असामान्याचें आणि भंगुराला चिरंतनाचें रूप देतो. लोखंड वितळवून त्याला रसाचें स्वरूप देणारी आग ज्याच्या अंतःकरणांत पेटते त्याच्या विचारालासुद्धां काव्याचें स्वरूप येतें.

तीव्र सामाजिक जाणीव हा वैद्यांच्या कविमनाचा एक अविभाज्य भाग आहे. पण या कविमनाला इतर अनुभूतीहि आकृष्ट करतात. त्याची वृत्ति एकंदरीत गंभीर आहे 'रेडा आणि ज्ञानेश्वर' या नांवाचा एक विनोदी चुटका 'साद' मध्ये आहे. त्यांत माजलेला रेडा म्हणून आपल्या विद्यार्थ्यांची संभावना करणाऱ्या गुरुजींना एक शिष्य ज्ञानेश्वर होण्याची विनंति करतो असें दाखविलें आहे. हा चुटका सामान्य आहे याचें कारण वैद्यांची वृत्ति विनोदाला अनुकूल नाहीं. मूलतः ती गंभीर आहे मात्र आपुलकीनें आणि करुणेनें जग पाहणाऱ्या या वृत्तीला प्रीतीच्या विविध स्वरूपांचें, वात्सल्याचें किंवा इतर कौटुंबिक भावनांचें वावडें नाहीं. 'बघूं नकोस वळून' या शीर्षकाच्या कवितेंतल्या

*अंचल मागें नीट, बघाया*
*नको फिरून फिरून*
*पडला नाहीं गुलाब खालीं*
*वेणींतून गळून*

या ओळींतला गोडवा नाजुक आहे. 'गेलीस आल्या पाउलीं' ही कविता अधिक गहिरी भावना व्यक्त करणारी आहे. प्रेयसी प्रियकराकडे येते. कांहीं मामुली कामाचें निमित्त करून थोडा वेळ जवळ जवळ मुकेपणानें ती बसते. कांहीं वेळानें बिचारी निघून जाते. मग प्रेमिक अस्वस्थ होतो. तिच्यापुढें आपलें अंतरंग आपण उघडें केलें नाहीं याची त्याला खंत वाटते. लाजऱ्या आणि बुजऱ्या प्रेमाची ही कळी कधींच उमलणार नाहीं या जाणीवेनें तो उद्गारतो,

*मज्जीवनाची गीतिका*
*धृपदासवेंच विरामली*
*बसुनी घडीभर सन्निधीं*
*गेलीस आल्या पाउलीं*

मुक्या प्रीतीची कहाणी सांगणाऱ्या या कवितेइतकीच 'अनर्थ' ही कविताहि हृदयस्पर्शी आहे. किंबहुना ती त्याच नाण्याची दुसरी बाजू आहे. सफल न झालेलें मुग्ध प्रेम ही या कवितेची पार्श्वभूमि आहे. प्रेयसी आणि प्रेमिक हे दोघेहि नियतीनें निश्चित केलेल्या आपापल्या जीवन-मार्गांनीं जात असतात. मध्यंतरीं त्यांची गांठभेट होत नाहीं. कालावधीनें एका समारंभांत तीं परस्परांना भेटतात. कांहींतरी बोललें पाहिजे म्हणून प्रेमिक विचारतो 'काय आहे ना ओळख ?' यानंतरचें वैद्यांचें वर्णन मूळ कवितेंतूनच वाचलें पाहिजे. हा साधा प्रश्न विचारणारा प्रेमिक म्हणतो,

*झाली गोरीमोरी मुद्रा*
*नरवें शब्दांचीं खुपलीं*
*स्वर थिजून सारिका*
*पुरी घायाळ जाहली*

*व्यथा भिजून अश्रूंत*
*अशी ताजी व्हावी पुन्हा*
*शिष्टाचार पाळतांना*
*मल  नव्हती कल्पना*

'प्रबोधन' मधील कारुण्यानें ओलसर झालेलें वात्सल्य वाचकाला रिझवण्याला समर्थ आहे. पण या कवितेची रंगत अपुरी वाटते. असें होण्याचीं कारणें निरनिराळीं आहेत. 'प्रबोधन' ची पहिली ओळ

*'उठायचं वरं आतां*
*पुरे हं बाळ अंगाई'*

अशी आहे. तिच्या पाठोपाठ

*'नभीं बालार्कही आला*
*दिशांना जिंकुनी दाही'*

ही ओळ येते. या दुसऱ्या ओळींतला 'बालार्क' हा शब्द त्यांत 'बाल' असूनहि फार प्रौढ वाटतो. त्याच्यामुळें पहिल्या ओळींतलें नाजुक, घरगुती वातावरण भंग पावतें.

*'नसे हो बाल्य या लोकीं*
*गरीबांच्या मुलांसाठीं*
*जगीं येतांच कर्तव्यें*
*तयांच्या लागतीं पाठीं'*

असल्या ओळींनीं आपल्या चिमण्या राजाची झोंपमोड करणाऱ्या आईच्या मनाची कारुण्यपूर्ण ओढाताण जाणवण्याऐवजीं त्या भावनेच्या नाजुकपणाचा चोळामोळा करणारा एक चिरपरिचित सिद्धांत मात्र पदरीं पडतो! कवितेंत भावनेची विशुद्धता टिकवणें ही अवघड गोष्ट आहे. पण असल्या कवितेंत ती टिकविली गेली नाहीं तर तळहाताच्या उबेनें क्षणांत कोमेजणाऱ्या प्राजक्ताच्या फुलासारखी तिची स्थिति होते.

या विभागांतील सर्वांत चांगली कविता ‘ सिग्नल ’ ही आहे. ती वाचतांना कुसुमाग्रजांची ‘आगगाडी व जमीन ’ मर्ढेकरांची ‘ फलाटदादा ’ व गडकऱ्यांची ‘ प्रेम व मरण ’ या कवितांची एखाद्याला अभावितपणें आठवण होईल. नाहीं असें नाहीं. पण ही कविता हा वैद्यांच्या निर्मितीचा एक उच्च बिंदु आहे. या कवितेंत वैद्यांची कल्पकता फुलून आली आहे. प्रेमिकाच्या उत्कट व निरपेक्ष भावनेचें चित्रण करणाऱ्या या कवितेंत घाटांतला एक बावटा व त्याच्या पुढून रुळावरून नित्यनेमानें धांवत जाणारी आगगाडी यांची प्रेमकथा आहे. यांची म्हणण्यापेक्षां बावट्याच्या मुक्या प्रीतीचीच ! या प्रेमाच्या प्रारंभाचें वैद्यांनीं केलेलें खालील वर्णन कुणीहि रसिक विसरूं शकणार नाहीं.

*जाई पुढ्यांतून रस्ता रुळाचा*
*जणों काय सुस्तावल्या नागिणी !*

*नेमें कुणी नित्य विद्युत् गतीनें*
*असे जात तोऱ्यामधें तेथुनी.*

*वस्त्रें नवीं नित्य ल्यावीं शरीरीं*
*कधीं हुर्मुजी, पीत वा श्यामल*

*दृष्टींतुनी विभ्रमे बेफिकीरी*
*गती जाणवे आणि उच्छृंखल.*

*नाहीं कधीं थांबणें बोलणें वा*
*कधीं दृष्टि विक्षेपही टाकणें*

*ठायीं तिच्या भाव जाई जडूनी*
*स्फुरूं अंतरीं लागलीं स्पंदनें.*

आगगाडीवर प्रेम करणारा हा बावटा पुढें एक भली मोठी शिला पडलेली पाहून तिच्या संरक्षणासाठीं सिद्ध होतो. तो म्हणतो,

*‘ आतां न येणार हा हात खालीं*
*इथें ब्रह्म साक्षात् जरी मूर्तलें !’*

मोठ्या निर्धारानें तो ताठ रहातो. खालीं येत नाहीं. त्यामुळे गाडीला थांबावेंच लागतें. त्याला तिच्यापाशीं आपलें हृद्गत व्यक्त करण्याची ही पहिली -आणि बहुधा शेवटची- संधि मिळते.

वैद्यांच्या या कवितेंत कल्पना चमत्कृतीवर अधिक भर असला तरी कवितेचा तोल व डौल पहिल्यापासून शेवटपर्यंत त्यांनीं मोठ्या झोकदार रीतीनें संभाळला आहे. या सुंदर कवितेला टीकेचें गालबोट लावायचें झालें तर ती किंचित् आटोपशीर असती तर अधिक रसाळ वाटली असती असें मी म्हणेन. कल्पना चमत्कृतीवर आधारलेल्या कवितांचा विस्तार त्यांच्या नाजुक सौंदर्याला हानिकारक होण्याचा संभव असतो. बालकवींच्या 'फुलराणी'त देखील हा अनुभव येतो.

वैद्यांच्या कविमनाचा कल सामाजिक विषयांकडे-विशेषतः समाजांतल्या आर्थिक विषमतेनें निर्माण होणाऱ्या अनर्थांकडे-आहे. दीनदलितांचीं दुःखें मोठ्या सहानुभूतीनें त्यांनीं 'साद' मधील कवितांतून वर्णन केलीं आहेत. त्यांच्या कविमनाला जीवनाच्या या अंगाचें अधिक आकर्षण कां वाटतें हें इतर कुणापेक्षांहि त्यांनाच नीट सांगतां येईल. पण पाणी जसें सखल प्रदेशाकडे सहज वाहत जातें, तसें त्यांचें संवेदनशील मन या गोष्टी अधिक सूक्ष्मतेनें आणि आपुलकीनें टिपून घेतें. आपल्या काव्यविषयांत तोचतोपणा येण्याचा संभव आहे ही जाणीव असूनही !

कदाचित् शाळा-कॉलेजांतल्या काळांत भोंवतालच्या समाजवादी विचारांनीं त्यांचें मन भारून टाकलें असेल ! अत्यंत संस्कारक्षम असें विशीच्या आसपासचें जें वय असतें त्यांत आर्थिक विषमतेनें या एका जगांत जीं दोन भिन्न जगें निर्माण केलीं आहेत, त्यांच्यांतील भयानक अंतराचें वास्तव दर्शन त्यांना झालें असेल ! या विश्वरूप दर्शनानें ते बेचैन होऊन गेले असतील ! आणि मग कुठेंतरी कानांवर पडलेली भेदक सुरावट गायकाला जशी विसरतां येत नाहीं, तशी या विषयाचें कधींच विस्मरण होऊं नये अशी त्यांच्या मनाची ठेवण बनून गेली असेल.

कारण कोणतेंहि असो, पण पद्याच्या पलीकडच्या काव्य प्रांतांत पाऊल टाकण्याकरतां जी अंतरीची तार हलावी लागते ती वैद्यांच्या बाबतींत विषमतेनें कंपित केली आहे. त्यामुळें त्यांच्या सामाजिक कवितांना जशी विशिष्ट शक्ति प्राप्त झाली आहे, तशा त्यांतल्या काव्यगुणांना कांहीं मर्यादा पडल्या आहेत.

दलितांविषयींची करुणा, त्यांच्यांतल्या सुप्त वीरत्वाला आवाहन, अन्यायानें त्यांना पायदळीं तुडविणाऱ्यांच्या हृदयशून्यतेची चीड यांमुळें वैद्यांची मनोवृत्ति धारदार बनलेली आहे. रुग्णालयांतला हाडांचा सांपळा दिसतांच त्याला उद्देशून ते म्हणतात–

*निर्धनता हीच जात गोत नी कुळी*
*आकाशें केली ज्यावरति सावली*
*त्याचा हा येथ उभा अस्थिपंजर*
*ज्ञानदान करण्यास्तव जीवनोत्तर!*
*प्राणान्तीं आज सुखें येति चालुनी*
*काचेचें गेह दक्ष नित्य रक्षणीं*
*उदर रितें होतें हें जवळ जोंवरी*
*केलें नच कोणीहि जवळ तोंवरी!*

दवाखान्यांतला हाडांचा सांपळा पाहून माणसाच्या मनांत मृत्यूचे विचार येतात. मनुष्याची क्षणभंगुरता आणि त्याच्यामागून जगांत त्याचें काय राहतें याविषयींच्या तरंगांनीं त्याचें मन झांकळून जातें. पण त्या सांपळ्याकडे पाहून वरील ओळींतील विचार सहसा कुणाला सुचणार नाहींत. याचें कारण वैद्यांच्या कविमनाला झालेली दीन–दलितांच्या दारुण दुःस्थितीची कायमची जखम हेंच आहे. हें दुःख ते कधीं कधीं 'भुके'सारख्या कवितेंत उघडपणानें व्यक्त करतात, इतकंच नव्हे तर 'दिवाळी' सारखी कविता लिहितांनाहि अंतरांत सलणारें हें कंटकशल्य ते विसरूं शकत नाहींत. दिवाळीचा लखलखाट पाहूनहि ते उद्गारतात–

*उरला तरि बहिरन्तर*
*दाटुन घनदाट तिमिर*
*ज्यांत अमित आजवरी जीवनें निमालीं.*
*धडपडतां अंधारीं*
*ये जीवा अंधेरी*
*कोण करिल तज्जीवित उजळुनि गतिशाली?*

'करूं या नवीं जगें निर्माण' या कवितेमध्यें त्यांची हीच व्यथा लढाऊ स्वरूप घेऊन प्रगट झाली आहे.

*दैन्य देऊनि मानवतेला*
*जयीं निर्मिलें वैषम्याला*
*चढवूं त्यांच्यावरती हल्ला*
*आणि करूं शिरकाण*

असे आवेशाचे उद्गार ते या कवितेंत काढतात. पण त्यांच्या सर्वच कविता केवळ दीनदुबळ्यांच्या दुःखांच्या जाणिवेनें किंवा त्या दुःखांवर हल्ला चढविण्याच्या ईर्ष्येनें रंगलेल्या नाहींत. त्यांच्या कणवेला, जाणिवेला, करुणेला, आव्हानाला व आवाहनाला अनेकदां कल्पकतेची जोड मिळते. त्यामुळें त्या त्या विषयाला काव्याचा स्पर्श होतो. 'टाळें लोखंडी', 'उंबरा', 'गस्तवाले होशियार', 'वजनयंत्र' वगैरे कविता अशा प्रकारच्या आहेत. 'हवन'मध्यें स्त्री जीवनाची दुर्दैवी कहाणी आहे.

या सर्व कविता काव्य गुणांच्या दृष्टीनें सारख्या नाहींत. अशी कविता लिहिण्याचें वैद्यांचें सामर्थ्य पाहायचें असेल तर 'रे करांनो माझिया' आणि 'अश्रुंनो व्हा चालतें' या कविता वाचल्या पाहिजेत. 'अश्रुंनो व्हा चालते' मधील

*'आपदा नच, मानवांची ही अनौरस संतति*
*जाणिवेनें याच माझी संपली भीति, क्षिति.*
*काम वज्रांचें कुठें का आसवांनीं भागतें?'*

या ओळी अविस्मरणीय आहेत. ' रे करांनो माझिया ' या कवितेंत कारुण्य, आवेश, कल्पकता आणि आशावाद यांचें विलक्षण पण आकर्षक मिश्रण झालें आहे. १९४९ सालीं कवीनें लिहिलेल्या या कवितेंतील–

*' छे, नको संदेह ! आतुर राहिलीसे होऊन*
*राजमुद्रा अंगुलीवर तुमचिया विलसावया '*

या ओळी आतां दहा वर्षांनीं वाचतांना पूर्वीपेक्षांहि अधिक अर्थपूर्ण वाटतील यांत संशय नाहीं. ही कविता म्हणजे श्रमजीवी जीवनाची नुसती कैफियत नाहीं. ती विजयाच्या पहिल्या वहिल्या स्वरांनीं त्याला पुलकित करणारी तुतारी आहे.

वैद्यांच्या सामाजिक कवितेंत एक लहानसा विभाग असा आहे कीं, केवळ सामाजिक या विशेषणानें त्यांच्या वैशिष्ट्याचा फारसा बोध होणार नाहीं. ' वसुन विमानांत ', ' नंगा पर्वतावर मोहीम ' ' आपुलीं हाकारा तारवें ' इत्यादि कविता या प्रकारच्या होत. ' आपुलीं हाकारा तारवें ' ही कविता वाचतांना कुसुमाग्रजांच्या ' कोलंबसाचें गर्वगीत ' या कवितेची आठवण होणें अपरिहार्य आहे. पण

*खिळवा नजरा अढळ ध्रुवावर*
*धरा सुकाणू घट्ट*
*शीड उभारा गलबत घाला*
*लाटेवरी विराट*

या ओळींतून उफाळून येणारा युयुत्सु आशावाद ही वैद्यांची कांहीं उसनी भावना नाहीं. दीनदलितांच्या दुःखानें कळवळून येणाऱ्या त्यांच्या कविमनाची ती दुसरी बाजू आहे. करुणा हा विषमतेनें भरलेल्या या जगांतला पर्जन्य आहे. पण नुसत्या पावसानें पिकें पिकत नाहींत. तीं कुजून जातात. त्या पावसाला उन्हाची जोड मिळावी लागते. जें दुःख पाहून आपण टिपें गाळतों, तें या जगांत

राहूं द्यायचें नाहीं अशा निर्धारानें मनुष्य जेव्हां धडपडूं लागतो तेव्हांच तो संस्कृति निर्माण करतो.

वैद्य विज्ञानाचें हंसतमुखानें स्वागत करतात. विज्ञान हा मानवाला मिळालेला शाप नाहीं, तो वर आहे, अशी त्यांच्या मनाची बैठक आहे. याचा अर्थ यंत्रयुगानें निर्माण केलेली विविध दुःखें त्यांना जाणवत नाहींत असें नाहीं. पण हीं दुःखें अपरिहार्य आहेत, क्रमप्राप्त आहेत, केवळ यंत्रानें निर्माण केलीं आहेत असें त्यांना वाटत नाहीं. त्यांतल्या अनेक दुःखांचा उगम मनुष्याच्या स्वार्थी वृत्तींत, लोभी स्वभावांत, दुसऱ्याला जाळून टाकणाऱ्या दुःखांवर स्वतःच्या सुखाची पोळी भाजून घेण्याच्या प्रत्येकाच्या प्रवृत्तींत, क्षणिक सुखांच्या आहारीं जाणाऱ्या मनुष्याच्या आत्म्याच्या बधिरतेंत आहे, असें त्यांना वाटतें. त्यामुळें आतांपर्यंत सामान्य माणसाला न मिळालेल्या अनेक सुखांचा खजिना उघडण्याची किल्ली विज्ञानानें मानवतेच्या हातांत दिली आहे अशा आत्मविश्वासानें वैद्य आपली आशावादी सामाजिक कविता लिहितात. ‘ बसुन विमानांत ’ या कवितेंत ते म्हणतात

*अज्ञाताच्या खणुनी खाणी*
*अमरत्वाचीं घडवूं लेणीं*
*मानवतेच्या वाहूं चरणीं*
*सुधातरंगिणि अलौकिकांतुनि उतरवुं लोकांत !*

मात्र विज्ञानाचें हें अद्‌भुत सामर्थ्य वर्णन करतांना गेल्या तीन-चार तपांत व्यक्त झालेल्या त्याच्या अंध, संहारक शक्तीकडे वैद्य दुर्लक्ष करीत नाहींत. ‘ बसुन विमानांत ’ याच नांवाची जी दुसरी कविता आहे, तिच्यांत त्यांचा हा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे.

विज्ञान किंवा यंत्र हें दुधारी शस्त्र असलें तरी त्याच्या धारेनें आपला हात केव्हां कापेल याचा नेम नाहीं म्हणून तें शस्त्र दूर फेकणें हा शुद्ध वेडगळपणा होईल. या शस्त्रावांचून मानवजातीची प्रगति होणार नाहीं अशीच वैद्यांची श्रद्धा आहे. ‘ नंगा पर्वतावर मोहीम ’ या कवितेंत ते मानवाच्या विजीगिषु वृत्तीचें,

असीम जिज्ञासेचें आणि मृत्यूवरहि मात करणाऱ्या त्याच्या आत्मिक सामर्थ्याचें कौतुक करतात ते यामुळेंच! या कवितेंत ते म्हणतात.

*नंगापर्वत!*
*पर्वत ऐसे कैक असती अजून मानवा उल्लंघायचे*
*नसावें विश्वीं अज्ञात कांहीं*
*ह्याच आकांक्षेनें*
*भारला मानव निघाला बाहेर*
*सोडून आपुलीं चिमुकलीं जगें.*
*महान् ध्येयें गाठतां गाठतां यावें मरण*
*काय यांत न व्यक्तिजीवन पावे सार्थक?*

विज्ञानाविषयींचें हें प्रेम, यंत्रानें मानवाला दिलेली नवी शक्ति आणि त्याची नवीं नवीं स्वप्नें यांचें विंदा करंदीकर सोडले तर अजूनहि इतर मराठी कवींना आकर्षण वाटत नाहीं उलट यंत्रयुगानें माणसाचें शेण झाल्याच्या तक्रारीच आपल्या वाङ्मयांत अधिक प्रमाणांत नमूद होत आहेत. 'ही एक मुंगी, ती एक मुंगी' या एकाच चष्म्यांतून गजबजलेल्या नागरी जीवनाकडे आणि यंत्रानें आमूलाग्र घडवून आणलेल्या परिवर्तनाकडे पाहण्याची आपल्यापैकीं बहुतेकांची पद्धत आहे. पण यंत्रांचा भस्मासुर आपल्या पाठीमागें लागला आहे, त्याच्या तावडींतून निसटण्याकरतां कुठेंहि निवांत जागा उरलेली नाहीं, म्हणून पावलों पावलीं उर बडवून घेण्याची वृत्ति सामाजिक दृष्ट्या निरोगीपणाची आहे असें मला वाटत नाहीं. कार्ल सँडबर्गच्या 'शिकागो' सारखी मुंबईवर आपल्याकडे एकहि कविता कां होऊं नये? याचें कारण एकच आहे. तें म्हणजे भारतीय मनाला अजून यंत्र पचवितां आलेलें नाहीं. मध्यम वर्गांतला मनुष्य अद्यापिही स्वप्नाळू दृष्टीनें भूतकालांत जमा झालेल्या जुन्या जीवनक्रमाकडे पाहात आहे. पण यंत्र पचविल्याशिवाय नव्या समाजाचाच नव्हे तर नव्या कवितेचाहि मार्ग सुकर होणार नाहीं. हार्ट क्रेन या अमेरिकन कवीचे याबाबतींतले पुढील उद्गार मननीय आहेत. तो म्हणतो, 'Unless Poetry can absorb machine

that is acclimatize it as naturally as trees, cattle, galleons, castles and all other human associations of the past, then poetry has failed of its full contemporary function.'

क्रेननें अपेक्षिलेली ही वृत्ति वैद्यांच्या ठिकाणीं स्वभावतःच आहे. पण 'वसुनि विमानांत', 'नंगा पर्वतावर मोहीम' वगैरे कवितांत तिचे अस्फुट अंकुर दिसतात. हे अंकुर पुढील काळांत विकसित झाले तर वैद्यांना मराठींत वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त होईल.

वैद्यांच्या विविध वाचनीय कवितांचें स्वरूप असें आहे. या निर्मितींतली 'सिग्नल' किंवा 'रे करांनो माझिया' अशा कविता पर्वतांचीं शिखरें दुरूनहि दिसतात त्याप्रमाणें वाचनानंतर दीर्घकाळ स्मरणांत राहाणाऱ्या आहेत. त्यांच्या सुगंधांत वैशिष्ट्य आहे, उत्कटता आहे. त्यांचा सहजासहजीं विसर पडत नाहीं. पण इतर अनेक कवितांत वैद्यांच्या काव्यात्मतेचा विलास पूर्णत्वानें आढळत नाहीं. सामाजिक जाणीव ही जशी त्यांच्या प्रतिभेची प्रेरक व प्रभावी शक्ति आहे, तशीच त्या प्रतिभेच्या मुक्त संचाराला पायबंद घालणारी ती मर्यादाहि आहे. या तीव्र सामाजिक जाणिवेमुळेंच त्यांच्या संवेदनेच्या कक्षेंत येणाऱ्या अनुभूति व त्यांची आविष्कारपद्धति यांत थोडाफार एकसुरीपणा जाणवतो. विशुद्ध भावना-काव्याचें तरल सौंदर्य वैद्यांना दुःसाध्य आहे असा मात्र याचा अर्थ नाहीं. पण नदीचें पात्र एकदां बनलें म्हणजे तिचें पाणी जसें त्या पात्रांतूनच वाहूं लागतें, तशी कविमनाची अनुभूति घेण्याची एक ठेवण बनून गेली कीं, विविध अनुभव तिच्या कक्षेबाहेर तरी राहतात किंवा ते कक्षेंत आले तरी काव्यात्मतेच्या केंद्रबिंदूपासून दूर राहतात.

स्वतःच्या पायांत स्वतःच हौसेनें घालून घेतलेल्या या सोनेरी शृंखलेंतून वैद्य ज्यावेळीं मुक्त होतात, त्यावेळीं पुनःपुन्हा वाचावीशी वाटणारी, आपल्या अस्फुट पण मधुर सुगंधानें अंतरंगांत रेंगाळत राहणारी विशुद्ध भावकविता ते सहज लिहून जातात. 'सुस्त झोंपली' हें त्यांच्या काव्यात्मतेचें उत्कृष्ट उदाहरण

आहे. त्यांच्या सामाजिक कवितेंतला आशय गद्यांत सांगतांना त्यांचा आवेश आणि कल्पनाविलास पुरेपूर प्रकट करतां येणार नाहीं. तथापि वैद्यांना काय म्हणावयाचें आहे हें अशा कवितांच्या बाबतींत सारांशानें सांगतां येईल. कारण त्या कवितेचें आवाहन बहुधा बुद्धि, कल्पना व स्थूल किंवा परिचित भावना यांनीं सीमित केलेलें असतें. पण मनांत जसें नाजुक अंतर्मन असतें, तशी स्थूल भावनेंत जिचें रंगरूप सांगतां येणार नाहीं अशी सूक्ष्म भावनाहि असूं शकते. तिचें दर्शन 'सुस्त झोंपली' या कवितेंत होतें. सुगंध जसा हातानें पकडून दाखवितां येणार नाहीं, तसें या कवितेचें सौंदर्य शब्दांनीं व्यक्त करतां येणार नाहीं. या कवितेंतलें चित्रण वैद्यांच्या कलाविलासाचें द्योतक आहे. निर्जन मार्गाच्या कडेला असलेल्या एका मंद दीपज्योतीचे हें भावचित्र आहे. त्या वाटेचें वर्णन वैद्य असें करतात–

*सुस्त झोंपली*
*चंचल नगरी*
*डोंगराच्या कुशींत*
*राखाडी साडीची*
*तिच्या नागमोडी*
*फिकट अबोली*
*किनार वाटेची !*

रात्रीची निःशब्द शांतता चित्रित करतांना ते म्हणतात—

*चिंचेच्या मांडीवर*
*विसांवला अंधार*
*मदिर स्पर्शाच्या*
*गोड गुंगींत !*
*ओशाळला वारा*
*लपला झाडीच्या*
*पदरा आड*
*रोधून श्वास.*

अशावेळीं वाटेच्या कडेला असलेली मंद दीपज्योति कशी दिसत आहे ? काय करीत आहे ? —

*वाटेच्या कडेला*
*म्हातारा दिवा*
*वाकली मान*
*खोकून खोकून*
*एकाकी जनान्ती*
*हुडकीत उभा*
*एकाग्रतेनें*
*रस्त्याच्या धुळींत*
*ओळखीच्या पावलांच्या*
*अस्पष्ट खुणा.*

'पाय शोधित निघाले' ही सुद्धां अशीच एक हृदयंगम कविता आहे. अशा कवितांत वैद्यांच्या काव्यलेखनांत आढळून येणारा शैलीचा ओघ तर असतोच. पण तो ओघ नकळत नाजुक आणि मुलायम बनतो. 'जगत्पतंग कुळें', 'सुरधवलोर करूं खालसा', असले शब्द प्रयोग त्यांच्या इतर कवितांत आढळतील. पण इथें असें टोचणारें, बोचणारें, सलणारें, खुपणारें कांहीं शिल्लक राहत नाहीं. चांदण्यांत वेडीवाकडीं झाडें आणि उघडाबोडका माळ यांची कुरूपता जशी विरघळून जाते, तशी अशा प्रकारच्या कवितांत वैद्यांच्या काव्य रचनेंतलीं वैगुण्यें लोप पावतात. 'कचरा', 'हीच तीं पाउलें', 'आड', 'माझी झरणी' या कविता 'सुरत झोंपली' इतक्या काव्यात्म नसल्या तरी निरनिराळ्या गुणांनीं आकर्षक झाल्या आहेत. मात्र त्यांतल्या अनेक कविता अधिक सूचकतेनें लिहिल्या गेल्या असत्या तर बरें झालें असतें असें वाटत राहतें. भावकविता रंगाळूं लागली व अधूनमधून गद्यप्राय रचना किंवा तार्किक आव्हाहन येऊं लागलें कीं तिचें सौंदर्य नकळत कमी होतें.

वैद्यांचें कविमन दुसऱ्याहि एका दिशेनें सौंदर्य शोध करीत आपल्या कक्षांच्या बाहेर पडत आहे असें दिसतें. हा प्रदेश संगीतिकांचा आहे. 'कोंकणाचा

राजा झिम्मा खेळतो ' व ' राजा श्रियाळ ' या वैद्यांच्या दोन संगीतिका. पहिलींत एक अद्भुत कथा त्यांनीं चित्रित केली आहे. दुसरींत चिलयाची प्रसिद्ध पौराणिक कथा नव्या स्वरूपांत मांडली आहे. या दोन्ही संगीतिकांमध्यें वैद्यांच्या पद्यप्रभुत्वाला व नादमधुर रचनेला चांगला अवसर मिळाला आहे. ' कोंकणचा राजा झिम्मा खेळतो ' या संगीतिकेच्या कथासूत्राची उत्तरार्धांतली गुंफण तितकीशी आकर्षक नाहीं. पण गीतमाधुर्य व वातावरणनिर्मिति या दोन गुणांनीं ही संगीतिका वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे. ' राजा श्रियाळ ' मध्यें वैद्यांच्या पुरोगामी वृत्तीवरोबर त्यांची काव्यात्मता आणि नाट्याची जाणीव यांचें मनोज्ञ दर्शन होतें. राजा श्रियाळाच्या कथेला वैद्यांनीं दिलेलें आधुनिक रूप अनेकांना आवडेल. या संगीतिकांमुळें वैद्यांच्या कविमनाला एक नवें क्षेत्र उपलब्ध झालें असलें, तरी काव्याच्या दृष्टीनें संगीतिकेला स्वभावतःच अनेक मर्यादा आहेत हें त्यांनीं व त्यांच्या वाचकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

' बहर ' पासून ' साद ' पर्यंतचा वैद्यांचा प्रवास असा झाला आहे. या प्रवासाचें ओझरतें निरीक्षण केलें तरी कांहीं गोष्टी सहज लक्षांत येतात.

वैद्यांना एका विशिष्ट प्रकारचें पण जातिवंत कविमन लाभलें आहे. विशींत अनेकांचीं मनें संवेदनशील असतात. म्हणूनच त्यावेळीं पुष्कळांना कवि होण्याची लहर येते. अनुभवांच्या मानानें कित्येकांच्या या मुग्धवयांतल्या कविता मोठ्या आशादायक असतात. पण जीवनांतला कोंवळ्या सोनेरी उन्हाचा हा प्रातःकाळ संपला, ऊन वाढूं लागलें, तापूं लागलें, अनवाणी पायांना चटके बसूं लागले, आयुष्यांतल्या अनेक अवघड जबाबदाऱ्या अंगावर येऊन पडूं लागल्या, मन कालच्या काळज्यांनीं आणि उद्यांच्या विवंचनांनीं कुरतडलें जाऊं लागले, म्हणजे ही निरागस संवेदनशीलता टिकविणें बहुतेकांना जड जातें. शरिराचें यौवन प्रौढ वयांतहि टिकणें किंवा टिकविणें ही आपण दुर्मिळ गोष्ट मानतों. पण जगाचा सारा व्यवहार कळूं लागला, त्याची कटुता पावलोपावलीं जिभेला जाणवूं लागली, ढोंगासोंगांनीं आणि लांडेलबाड्यांनीं मन विटून जाण्याचे प्रसंग दररोज येऊं लागले, हातून न घडलेल्या अपराधांचे चटके आपल्याला बसूं लागले, खऱ्या-

खुन्या जिवलगांनाहि आपलीं सुखदु:खें कळत नाहींत या विचित्र जाणिवेनें मन व्यापून टाकलें, जग निर्माण करणारा देव असो वा नसो पण जगांतल्या सुख-दु:खांना कांहीं कार्यकारण भाव आहे कीं नाहीं याचाच हरघडी संशय येऊं लागला, म्हणजे नकळत मनुष्य मनानें बधिर होतो. ही बधिरताच त्याचा स्वभाव होऊन बसते. कारण तीच या विषम जीवनसंग्रामांत हरघडी त्याची ढाल बनते. प्रसिद्ध फ्रेंच लेखक कामू याच्या 'Outsider' या कादंबरीचा नायक असाच आहे. संवेदना अशी बधिर झाली म्हणजे विशीपंचविशींतल्या हृदय फुलविणाऱ्या किंवा कोमेजवून टाकणाऱ्या अनुभवांचा त्याच्यावर काडीइतकाहि परिणाम होत नाहीं. अशा स्थितींत पोंचलेला मनुष्य काव्य करण्याच्या भानगडींत कशाला पडेल ?

पण जातिवंत कविमनाची संवेदनशीलता हें सर्व हालाहल पचवितें. तें पचवून ती विशी पंचविशींतल्या सारखी ताजी राहते जीवनाविषयींचें तिचें कुतूहल कमी होत नाहीं. जीवनाची रम्य आणि भीषण गूढता या कविमनाला सदैव स्फूर्ति देते. या संवेदनशीलतेमुळेंच प्रौढत्वांत वैद्यांनीं आपलें शैशव नसलें तरी यौवन कायम राखलें आहे. केशवसुतांपासून विंदा करंदीकरांपर्यंत सामाजिक जाणिवेनें स्फुरलेलें जें मराठी काव्य आहे त्यांत वैद्यांनीं घातलेली भर दुर्लक्ष करण्याजोगी नाहीं 'रे करांनो माझिया' सारख्या त्यांच्या कांहीं कविता रसिकांना दीर्घकाळ आनंद देत राहतील.

याचा अर्थ वैद्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या काव्यगुणांचा पूर्ण विकास झाला आहे असा नाहीं. 'कोंकणचा राजा झिम्मा खेळतो' या संगीतिकेचा पूर्वार्ध वाचतांना माधवानीं आपल्या कवितेंत कोंकणाचे जें तरल, अद्भुतरम्य सौंदर्य चित्रित केलें आहे त्याची आठवण मला झाली. वाटलें, वैद्यांनाहि अशा कविता लिहिणें कठिण नाहीं. हार्डी आणि डी ला मेर यांची कविता मी वाचली तेव्हां राहून राहून माझ्या मनांत येत होतें, आपले डोंगर, आपल्या दऱ्या, आपला समुद्र, आपली वनश्री, आपल्या लोककथा यांचें केवढें तरी मोठें भांडार आधुनिक मराठी कवींनी अजून तसेंच बाजूला टेवलें आहे.. अगदीं अस्पृश्य मानून !

त्यांचा उपयोग करणारा एखादा कुशल कवि एखादें सुंदर खंडकाव्य लिहील वा न लिहिल ! पण हार्डीसारखीं छोटीं छोटीं कथाकाव्यें लिहायला त्याला कोणतीच अडचण पडूं नये. अशा प्रकारच्या कथालेखनाला लागणारी वृत्ति वैद्यांच्या ठिकाणीं निश्चित आहे.

दीनदलितांच्या मूक दुःखांना वैद्यांनीं आपल्या कवितेंत वाचा फोडली आहे. परंतु या विराट जगांत आणि त्याचबरोबर या जगांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या विलक्षण अशा हृदयविश्वांत विविध सुखदुःखांची आणि संवेदनांची भरती ओहोटी सतत सुरू असते. काळ पुरुषाच्या प्रत्येक पावलाबरोबर आणि समाज पुरुषाच्या प्रत्येक हालचालीबरोबर जुनीं सुखें चिरडलीं जातात, नवीं दुःखें निर्माण होतात. नव्या दुःखांच्या जोडीला नवीं सुखेंहि येतात. हीं अगणित सुखदुःखें सूक्ष्म, संमिश्र स्वरूपांत आपल्या भोंवतालीं नित्य वावरत असतात. सामान्य मनुष्याला त्यांची फारशी जाणीव असत नाहीं. पण या सर्व अनुभूति टिपणें, त्या साऱ्या सुखदुःखांना बोलकें करणें हें वैद्यांसारख्या कवींचें काम आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत आपलें जीवन अंतर्बाह्य बदललें आहे. पावसाळ्यांतल्या पूर आलेल्या नदीच्या वेगानें नवीं परिवर्तनें होत आहेत. त्या बदलणाऱ्या जीवनाबरोबर समाज अधिक संमिश्र आणि संकुल होत आहे. त्याचीं सुखदुःखेंहि पूर्वीसारखीं एकपदरीं न राहतां अनेक पदरीं झालीं आहेत. पूर्वकाळीं कवि हा समुदायाचा प्रतिनिधि असे. आतां तो जितका समुदायाचा, तितकाच किंबहुना अधिक प्रमाणांत सामान्य मानवाचा प्रतिनिधि झालेला आहे. व्यक्तीच्या पायांतील अनेक शृंखला गळून पडल्या आहेत. स्वतःच्या भावना-अगदीं सूक्ष्मांतल्या सूक्ष्म भावना-चित्रित करायला कवि पूर्णपणें मोकळा झाला आहे. त्यामुळें त्याच्या काव्यात्मतेच्या नाजुक आणि स्वच्छंद विलासाला कितीतरी नवीं क्षेत्रें आतां उपलब्ध झालीं आहेत. या नव्या क्षेत्रांत वैद्यांच्या कविमनानें मुक्त संचार करावा असें मी मनःपूर्वक इच्छितों.

एक भाषिक राज्याच्या उंबरठ्यावर आज महाराष्ट्र उभा आहे. अनेक परंपरागत गुणदोषांची शिदोरी बरोबर घेऊन तो उद्यांचा प्रवास करणार आहे.

' प्राप्तकाल हा विशाल भूधर ' हा केशवसुतांचा चरण मराठी मनाच्या आणि जीवनाच्या दृष्टीनें पुन्हा एकदां अक्षरशः खरा झाला आहे. या अनुकूल काळाच्या विशाल पर्वतांत सुंदर लेणीं खोदण्याचें काम मराठी जनतेला करायचें आहे. हें काम सोपें नाहीं. कष्टांचें आहे; कालावधीचें आहे. अशा वेळीं सामाजिक जाणिवेनें भारलेले आणि यंत्रयुगाला हंसतमुखानें सामोरे जाणारे वैद्यांसारखे कवि नव्या जोमानें काव्याकडे वळतील व समतेचीं स्वप्नें साकार करण्याकरतां धडपडणाऱ्या नव्या महाराष्ट्राचे श्रम आपल्या गाण्यानें हलके करतील अशी आशा केली तर ती अस्थानीं ठरणार नाहीं. या नव्या प्रवासांत काले सँडबर्गचे पुढील प्रेरक शब्द वैद्यांची सतत साथ करोत–

I tell you yesterday is a wind gone down
a sun dropped in the west;

I tell you there is nothing in the world
Only an ocean of tomorrows
a sky of tomorrows

( काल ? कालचा दिवस ? भूतकाळ ? त्याची कुणाला काळजी करीत बसला ? ती निघून गेलेली वायुलहर आहे. तो मावळतीपाशीं पोंचलला सूर्य आहे.

जगांत दुसरें कांही कांहीं नाहीं. फक्त समुद्र आहे. उगवणाऱ्या दिवसांनीं भरलेला, उज्वल भविष्यानें रंगलेला समुद्र ! आणि दुसरें आहे आकाश. उद्यांच्या अरुणानें रंगणारें, नव्या नव्या उषेचें स्वागत करणारें आकाश. )

कोल्हापूर,
१८–३–६०

वि. स. खांडेकर.

# झरणी

भगीरथानें
आणिली गंगा
स्वर्गामधुनी
पृथ्वीवरती
अंत न विक्रम.

वरून खालीं
यावें सहजीं
स्वभाव हा तर
असे जलाचा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ०६६५८ दि: ५।०५
क्रमांक २०६८ नोंद दि: ३०।३।०५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९०३

स्वातंत्र्याची
नेली गंगा
नरासुरांनीं
पृथ्वीवरची
पाताळामधि
पुन्हा तेथुनी
आणिली ज्यांनीं,
जीवनदानामधून
दिधलें जीवन,
केलें कृतार्थ, पावन
या धरणीला,
तुम्हां आम्हांला.

पुराणांतल्या
भागीरथाहुन
असे तपस्या
श्रेष्ठ जयांची
ज्ञात आणि
अज्ञात मानवी
भगीरथांची
शपथ तुम्हांला,
शपथ आम्हांला,
मला
कवीला—
" अप्रतिहत
वाहुं द्या वाहिनी
गांगजलानें
होवो धरणी
सस्यश्यामला,
मरुभूमीची
राहूं द्या न च
नामनिशाणी. "

मी न भगीरथ,
सिद्ध तपस्वी,
मी नच सैनिक,

मी न कृषीवल,
मी शास्त्रज्ञ न.
सामन्यांतिल
कुणी तरी मी.
कशी शपथ ही
पाळायाची ?

व्यथा प्रीतिची,
शब्दशरांची,
परिस्थितीच्या
निर्घृणतेची
करिते मजला
व्याकुळ जेव्हां
करिते अंतर
हलकें तेव्हां
स्निग्धजनापरि
अशा एकल्या
झरणीवांचुन
कांहीं नाहीं
माझ्या हातीं.

परंतु होते
भगीरथांच्या
त्या शपथेची

पुराणांतल्या
भागीरथाहुन
असे तपस्या
श्रेष्ठ जयांची
ज्ञात आणि
अज्ञात मानवी
भगीरथांची
शपथ तुम्हांला,
शपथ आम्हांला,
मला
कवीला—
" अप्रतिहत
वाहुं द्या वाहिनी
गांगजलानें
होवो धरणी
सस्यश्यामला,
मरुभूमीची
राहूं द्या न च
नामनिशाणी. "

मी न भगीरथ,
सिद्ध तपस्वी,
मी नच सैनिक,

मी न कृषीवल,
मी शास्त्रज्ञ न.
सामन्यांतिल
कुणी तरी मी.
कशी शपथ ही
पाळायाची ?

व्यथा प्रीतिची,
शब्दशरांची,
परिस्थितीच्या
निर्घृणतेची
करिते मजला
व्याकुळ जेव्हां
करिते अंतर
हलकें तेव्हां
स्निग्धजनापरि
अशा एकल्या
झरणीवांचुन
कांहीं नाहीं
माझ्या हातीं.

परंतु होते
भगीरथांच्या
त्या शपथेची

अधिकाधिक मज
जाणीव यदा
धुकें व्यथेचें
जातें वितळून,
होतें माझें
मीपण जागें,
वाढुं लागतो
माझ्यामधला
आणि अयं जनः.

सामान्यांतिल
कुणीतरीची
सरते भाषा,
सामर्थ्याचा
होतो साक्षात्कार
नवा मज.

ही नच झरणी !
शब्द ब्रह्म जें
आदिकवींच्या
ज्ञानेशांच्या
अन् रोजेच्या

स्फुरून अंतरीं
रूपा आलें
त्या ब्रह्माचें
वाहक–झरणी
असे करीं मम.

सामान्यांतिल
कुणी तरी हा
समर्थ आतां
उठवायातें
अचेतनांतुन
ओसाडींतुन
प्रणवघोष मी !

ही नच झरणी !
भिजवित धरणी
निघे आपगा
झुळु झुळु झुळु झुळु
कुठें खळाळत,
गभीर मंथर
कुठें धडाडत.
आडवावया,
आटवावया,

दूषित करण्या
सरित्स्रोत तो
आले कोणी
उधळित अण्वस्त्रें प्रलयंकर
त्या अस्त्रांचे
होती ज्याच्या
दर्शनेंच
निस्त्राण रजःकण
असें सुदर्शन
माझी झरणी.

कोनाकोनीं
दूर उपेक्षित
तृषित युगांचीं
जीवन्मृत
तृणबीजें पडलीं
त्यांच्यासाठीं
होते कावड
माझी झरणी.

बहुरंगी
नवसृष्टी येतां

गंगेच्या
वरदानें उदया
उभविल वरती
संगीतांचीं
इन्द्रधनुष्यं
होऊन अलगुज
माझी झरणी.

---

१ ' ला मार्सेलिस ' या फ्रेंच राष्ट्रगीताचा कर्ता.

# सुस्त झोंपली

सुस्त झोंपली
चंचल नगरी
डोंगराच्या कुशींत
राखाडी साडीची
तिच्या नागमोडी
फिकट अबोली
किनार वाटेची.
ओशाळला वारा
लपला झाडीच्या
पदराआड
रोधून श्वास,
चिंचेच्या मांडीवर
विसांवला अंधार
मदिर स्पर्शाच्या
गोड गुंगींत,
वाटेच्या कडेला
म्हातारा दिवा
वांकली मान
खोकून खोकून
एकाकी, जनान्तीं
हुडकीत उभा
एकाग्रतेनें
रस्त्याच्या धुळींत
ओळखीच्या
पावलांच्या
अस्पष्ट खुणा.

# अनर्थ

झाली ताटातुटी किती
वर्षे उलटून गेलीं
खोल जिव्हारीं जखम
होती अजूनही ओली.

भेटलीस अचानक
समारंभाच्या गर्दींत
हंसूं उठविलें ओठीं
मन कष्टें सावरीत.

हवें होतें बोलावया
जाऊं दिल्यावीण झोंक
विचारीलें निरर्थ मी
" काय आहे ना ओळख? "

झाली गोरीमोरी मुद्रा
नखें शद्बांचीं खुपलीं,
स्वर थिजून सारिका
पुरी घायाळ जाहली.

व्यथा भिजून अश्रूंत
अशी ताजी व्हावी पुन्हां
शिष्ठाचार पाळतांना
मला नव्हती कल्पना.

दुःख एकान्तीं साहिलें
दोन तपावरी उरीं
भार बोलून नव्हता
त्याचा व्हावयाचा दुरी.

वाभळीचा तीक्ष्ण कांटा
माझा झाला शिष्टाचार
आणि नव्याच दुःखाचा
उरीं झाला आविष्कार.

ध्यानीं मनीं नसतांना
भेट झाली अकस्मात
अजाणतां निरर्थाचा
आणि जाहला अनर्थ !

# पाय शोधीत निघाले

होती छडीत चंद्रिका
शारदीय उल्हासांत
किरणांच्या तारांवरी
मंद्रलयींत ललत.

गुंडाळून गळ्याभोंतीं
शाली आपुल्या हातांच्या
गाल गालाला लावून
झालों स्वाधीन स्वरांच्या.

जाणिवेला आली नीज
गति पळांची थांबली
संगीताच्या पंखावरी
पार्थिवता तरंगली.

मांजरीच्या पावलांनीं
गेली चांदरात दूर
लगे शुक्राचा गंधर्व
आळवाया तेजःस्वर.

तोंच कानाला स्पर्शला
श्वास वाऱ्याचा खारट
घनगंभीर रागाचा
नाद आला पाठोपाठ.

खर्ज, मंद्र, तार ऐशा
होती अनंत स्वरांची
एकलयींत संगती
झाली संघ-संगीतांत.

गोड मूर्च्छना मदिर
खडबडून पळाली,
चाळवली अस्वस्थता
आणि समाधी भंगली.

सैल झाले नकळत
गळ्या भोंवतीचे हात
पाय शोधीत निघाले
किनाऱ्याची पायवाट.

# लावणी

पावसानं भराऊन आलं हें आवण
कां ग तुझी पदराशीं चाले ओढाताण ?
वाढती हे झपाट्यानं दिसादिसा रोप
संध्याकाळीं नाहीं तुझं सकाळचं रूप !
आवणांत रोपांची हो वाऱ्यानं सळसळ
कां ग फिरकतां कोणी तुझी तारांबळ ?
रीघ लागे लहरींची वाऱ्यानं आवणीं
रंगांत तरंग तुझ्या लज्जेनें आननीं.
थांबली रोपांची पहा वाढ आवणांत
उदासीन कां तूं आईबापांच्या घरांत ?
आवणाची चाले बाई लावणी शेतांत
सोंपवाया हवं तुला दुज्याच्या हातांत.
फोंफावून रोपं मग होतील पिवळीं
तूं ही थोड्या दिसामाजीं नागीण गव्हळी.
वाढवा फुलांत, करा लाड, जीव लावा
ओढाळ ही जात बाई परक्याचा ठेवा.

# सिग्नल

होता उभा एकला एक जागीं
कुणी दाट घाटामधें सिग्नल
श्वेतांबरें लेवुनी पुण्डरीकें
इथें लाविलें ध्यान कीं निश्चल !

जाई पुळ्यांतून रस्ता रुळाचा
जणों काय सुस्तावल्या नागिणी !
नेमें कुणीं नित्य विद्युद्रतीनें
असे जात तोऱ्यामधें तेथुनी.

वस्त्रें नवीं नित्य ल्यावीं शरीरीं
कधीं हुर्मुजी, पीत वा श्यामल.
दृष्टींतुनी विभ्रमे बेफिकीरी
गती जाणवे आणि उच्छृंखल.

नाहीं कधीं थांबणें बोलणें वा
कधीं दृष्टिविक्षेप ही टाकणें
ठायीं तिच्या भाव जाई जडूनी
स्फुरूं अंतरीं लागलीं स्पंदनें.

वाटेकडे लोचनें लावुनीया
करावें अहोरात्र आलोकन
येतां तिची दृष्टिमार्गांत मूर्ति
बसे जीव डोळ्यामधें येऊन.

यावें तिनें आणि जावें निघूनी
कुणी नाइके मूक संबोधन
वाटे भरोंसा परी मानसा कीं
जडालाहि घे प्रेम आकर्षुन.

गेले किती पावसाळे, उन्हाळे
कुणीही न आस्था परी दाविली
कसें करावें खुलें हृद्‌गतासीं
विचारेंच या वृत्ति वैतागली.

बोले मना, ' भीड, संकोच आतां
नको काय ठेवावया सारून ?
मार्गीं स्वयें थांबवूनी सखीला
कराया खुलें पाहिजे हें मन. '

एके दिनीं या अशा निश्चयानें
उभा राहिला हात उंचावुन
साह्यास पाचारिल्या सर्व शक्ती
करीं ठेविल्या आणि एकत्रुन.

लागे दिसूं दूर मूर्ति प्रियेची
धडाडूं जवें लागलें अंतर
वक्त्रीं चढे रक्तिमा, कंप देहीं,
उरीं माजुनी राहिलें काहुर.

उग्राङ्गना ये यदा सन्निधीं ती
ढळे धैर्य ये खालती ही कर
केले किती यत्न वर्षानुवर्षें
परी घात हो ऐन वेळेवर.

आशा परी खेळवी प्रेमिकाला
तमिस्रेंत ही पूर्णिमा दावुनी
दे धीर कीं योग येतांच येती
स्वयें ईप्सितें सर्व ही चालुनी.

झाल्या सुरू आणि आषाढधारा
जणूं काय कीं कोसळे अंबर
नीरौध माथ्यावरूनी गिरींच्या
सवें लोटती घेउनी प्रस्तर.

त्या लोहमार्गावरी एक रात्रीं
अजस्रा शिला येतसे लोटुनी
बोले मनीं कीं शिला ही न येथें
उभा राहिला काळ हा येउनी !

ठेचाळतां या पथीं प्रेयसीच्या
जिवा काय होईल ना कल्पवे !
ये संधि सेवा करायास आतां
दुजें याहुनी काय कोणा हवें ?

गेलें जिवा स्पर्शुनी दिव्य कांहीं
नवें धैर्य अंगांत संचारलें
आतां न येणार हा हात खालीं
इथें ब्रह्म साक्षात् जरी मूर्तलें !

प्रीति इथें जाहली कार्यकर्त्री
फलाशा परार्थामधें होमुनी
स्वार्था मिळे आहुती ज्या क्षणाला
भयें भस्मती सर्वही त्या क्षणीं.

आली, उभी राहिली सन्निधीं ती
परी आज ना वृत्ति भांबावली
मौनींच संभाषले जीव दोन्ही
हृदींची मुकी भावना जाणली.

बोले तया ती, " न मी धुंद केव्हां
तुझें जाणतें प्रेमपूर्णान्तर
माथां परी घेतलीं लोककार्यें
न देऊं शके त्यास मी अंतर.

कार्यीं निमग्ना तरी ठेविते मी
तुझी मूर्ति दृष्टीपुढें निश्चल
आज्ञा तुझी घेतल्यावीण केव्हां
न मी टाकिते रेसही पाऊल. "

" आज्ञा तुला द्यावया तूं न दासी
न सुल्तान मीही तसा केवळ
आज्ञा मला ही मिळे येथूनी मी
न हालायाचे एकही अंगुळ.

राखीतसे मी तुझी दक्षतेनें
उभा राहुनी वाट रात्रंदिन
झालें परी ज्ञात हृद्गात्र आतां
नवें प्राप्त हो येथुनी जीवन.

कार्यींच रंगून राहील प्रीति
नवी चारुता प्रत्यहीं निर्मुन
देहें जरीं योजनें कैक दूरी
करूं सत्य अद्वैत भेटीविण."

झालें न हें एवढें बोलणें तों
उभे राहिले येउनी सेवक
आज्ञापिलें आणि त्यानें कराया
तयां वाट तात्काळ निष्कंटक.

जांया अनुज्ञा खुणावून हस्तें
सखीतें दिली दूर होता शिला
टाकीत तीही पदें मंद जाई
उरीं घेऊनी जीव भारावला.

# बघूं नकोस वळून

बघूं नकोस वळून

अंचल मागें नीट, बघाया
नको फिरून फिरून.

पडला नाहीं गुलाब खालीं
वेणींतून गळून.

विनयवती चालती खालती
नित्य नजर लावून.

कोण मागुती ? काय कुणाला
करायचें जाणून ?

असेच रस्त्यावरूनी चालती
जन मागून पुढून.

व्यथित जीव असतील येथही
हिंडत अधुनमधून.

जातां येतां परी न आस्था
कुणि टाकी उधळून.

फिकिर आपणां कशास जावो
मागें विश्व बुडून ?

# गेलीस आल्या पाउलीं

आलीस गेहीं माझिया तूं काम घेउन मामुली
बसुनी घडीभर सन्निधीं गेलीस आल्या पाउलीं.

फारा दिसांची आस कीं यावेस तूं माझ्या घरीं
कळलें गमे गुज तें तुला आनंदलों मी अंतरीं.

गर्दींत गप्पांच्या कुठें तुमजेल जातिल तास ते
येईल ध्यानीं गे तदा तूं कोण अन् मी कोण तें.

हृद्भाव सारे लाजरे करुं एकदां आतां खुले
आलें मनीं माझ्या असें दारीं तुला जैं देखिलें.

"इकडे कुठें ?" "इकडेच !" हीं प्रश्नोत्तरें दिसतां क्षणीं
कथिलेंस ना बसलीस तों आलीस कां तें ही झणीं.

मी ही दिली तुज माहिती जी पाहिजे होती तुला
अन् त्यापुढें बोलायला मुद्दाच नाहीं राहिला.

वाणी मुकी झाल्यावरी चुकवून डोळा पाहणें
डोळ्यास डोळा लागतां पायातळीं न्याहाळणें.

गेले किती क्षण हे असे निस्तब्धता सगळीकडे
उठलीस नी वदलीस तूं "जाते हं मी आतां गडे."

केलीस पुट्पुट कांहिंशी कळलें न कांहीं याहुनी
जातांच दृष्टिपल्याड अन् गेलीस आलें समजुनी.

माझें मला मी निंदिलें कीं मी पुरा मुखदुर्बळ
गमलें असेल तुलाहि कां येणें तुझें हें निष्फळ !

मज्जीवनाची गीतिका ध्रुपदासवेंच विरामली
बसुनी घडीभर सन्निधीं गेलीस आल्या पाउलीं.

# कोंकणचा राजा झिम्मा खेळतो

(संगीतिका)

[ ' अंबा पिकतो रस गळतो कोंकणचा राजा झिम्मा खेळतो ' या गाण्याचे सूर येतात व विरतात. ]

निवेदक : युद्ध, यादवी रंगवितांना सनावळी टिपतांना
नोंदाया जी भान न उरलें इतिहासाच्या पानां,
नवा जुना नटवितां आपुला ऐसपैस संसार
अपरांतांतिल दंतकथा ही जिला विसरल्या पार,
शरदामध्यें स्मरण कुसुंबी आम्रतरूला होतें
जागी होउन कथा मानसीं ध्यास कोकिळा घेते,
राईराईमधून उठतो सवाल ' कूहूकूहू ?'
कडेपठारामधून घुमतो निनाद ' कूहू कूहू'
' आहे का कुणि, आहे का कुणी, ऐकायास कहाणी? '
' कूहू कूहू ' आक्रंदत ती फिरते वेड्यावाणी.
नव्हता पळभर कुणी आजवर उभा राहिला श्रोता
सांगतसे ती रसिका कोकिळ कथा अनुभवा आतां.

[ कोकिळेचें कूजन कानावर येतें. मग समुद्राच्या लाटांचा आवाज येऊं लागतो. त्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर दुरून गाणें ऐकूं येतें. गाण्याचा आवाज हळू हळू जवळ येऊं लागतो ]

आम्ही दर्याचे लाल
आम्ही दर्याचे लाल !

[ या ओळींचीं आवर्तनें होऊन विरतात. ]

तीः हीच हीच ती लकेर
करि अधीर जी अंतर
मोहरले लाख मळे
गंध धुंद दरवळले
नकळत मन विरघळलें
देहाचा होय विसर !
संवादी नादांतुन
जागें मनिं होय गान
वाटे अभिसार करून
स्वरिं जावें गुंफित स्वर.

तोः आम्ही दर्याचे लाल !
आम्ही दर्याचे लाल !
पाताळभेटींत
आकाश गाठींत
लाटांच्या मिठींत
अमुचा महाल !
क्षितिजाच्या ओढींत
अवकाश तोडींत
काळाच्या दाढेंत
फिरतो त्रिकाळ.
गंभीर घोषांत
सारंगाचें गीत
गातो अहोरात्र
दर्या फेसाळ.

[ गाणें म्हणत म्हणत तो किनाऱ्यावरून ती उभी असते त्या आंबराईत येतो. ]

तो: आंब्यामागें कोण त्या तिथें ?

ती: नवल पाखरूं फडफडतें !

तो: कोण कुणाला बघुन लाजलें ?

ती: जिनें जयाला अपुलें म्हटलें !
फार दिसांनीं झाला आगम ?

तो: वियोगांत क्षण गमती युगसम.

ती: कशी इकडली चुकली वाट ?

तो: तुझी घ्यावया आलों गांठ.

ती: खरंच गडे का माझ्यासाठीं
आलां तुडवित डोंगरमाथीं ?

तो: होय साजणी, तुलाच हुडकित
प्रकाश जैसा पहाट धुंडित !

ती: खरंच ?

मज माझें लाभलें
गंधाच्या गंगेंत आज मी मनमुराद न्हालें.

सुभग मेघ वोळले अकल्पित
फळास आलें माझें संचित
मिळे युगांचें मजला ईप्सित
धन्य धन्य जाहलें !

आम्रतरू कल्पद्रुम ठरला
ऐनदुपारीं चंद्र वरसला
स्वप्न फुलांचा पाऊस पडला
मधुरस ओघळले !

तो: तुझ्या नि माझ्या पाउलवाटा
एकांमेकां भिडल्या आतां
एकच पुढती वाट येथुनी
थेट जातसे भविष्यांतुनी.
दोन जीव दिसतील कुणाला
भ्रमांत त्या राहुंदे जगाला.

हांस गोड सखि, हांस एकदां
साठवुं दे ही उरीं संपदा.
आल्या बघ या लाटा घेऊन
दर्याचें मजसाठिं निमंत्रण
कर भेटीचा हा अमरक्षण
शिंपुन त्यावर तव हास्यसुधा.
दर्यावर्दी जीवन अमुचें
पंख तयाला जरि धीराचे
रंग गडद त्यावर विरहाचे
क्षणभंगुर कर विरह--आपदा.

ती: थयथयथय कारंजें नाचतें मनाचें !
रंगावर मोहरती गेंद सुवासांचे.
विरघळले मधुरसांत बंध जाणिवेचे.
तरलविरल गान वने आज जीवनाचें.

नगर वाचन मंदिर ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम ......... दि: .........
क्रमांक ......... नों दि: .........

तो: नाव किनाऱ्यावरती आतुर
पाय न उचले, हो जड अंतर.
येतों आतां भेट उद्यांला
याच तरुतळीं या वेळेला.

ती: ओलांडुन लाटांचे पर्वत
माझ्यासाठीं यालच धांवत
विश्वासावर याच विसंबुन
वाट आपुली पाहत राहिन.

[ सागरगर्जिताच्या पार्श्वभूमीवर 'आम्ही दर्याचे लाल' हें संघगीत सुरू होतें. नाव दूर जाते. गाणें अस्पष्ट होत विरतें. फक्त लाटांचा आवाज उरतो. दुसऱ्या दिवशीं समुद्रावर वादळ होतें. ती त्याच ठिकाणीं त्याची वाट पाहत असते. तिला त्याचे शब्द आठवतात. ]

येतों आतां भेट उद्यांला
याच तरुतळीं या वेळेला.

ती: गेली वेळ टळून !
गेलास कसा काल दिलेला
आज शब्द विसरून ?
नावेनें तव दुजें गांठिलें
बंदर काय चुकून ?
वादळवातासवें चालली
सरे न झुंज अजून ?

[ दोन दिवस समुद्रावर खूप वादळ झालें. तिनें किनाऱ्यावर दोन दिवस वाट पाहिली. तिसऱ्या दिवशीं– ]

तीः गेला सखि, जिव उडुन.
दोन दिवस मावळले
क्षण वर्षासम गेले
कुशल न त्यांचें कळलें
कुठलें ग ऽ मग दर्शन ?
काल म्हणति पाण्यावर
जाहले तुफान घोर
आज मनांतिल काहुर
करि जीवन छिन्नभिन्न.

[ सागरास उद्देशून-- ]

जीवनमय तूं गुणगंभीरा !
प्रसन्न होसी जीवन देसी
आणि फुलविसी ही वसुंधरा.
नाहीं का रे कलश सुधेचा
दिलास आणुन तूंच सुरां ?
पेला माझा इवला प्राशुन
होसी का समृद्ध उदारा ?
रत्ननिधे, तुज सुवासिनीची
आण, हिरा मम आण घरा.

सखि:        कसें करूं मी तुझें सांतवन ?
होणारें चुकणार कधींच न.
    येउं नये ती वार्ता आली
    उरली सुरली आशा तुटली
    किती जरी आसवें गाळिलीं
कृतांत होइल काय दयार्णव ?

तीः        रे कृतांता काय केलें ?
हात हिरव्या बिल्वरांनीं नाहिं हे रोमांचले
तोंच कां रे निर्दया ते तोडूनी तूं टाकिले ?
अजुन मंगलसूत्र नव्हतें या गळ्याला स्पर्शलें
वज्र मानेवर असे तूं तोंच का रे फिरविलें ?
[ तिला मूर्च्छा येते ]

[ त्या देशाचा राजा तिच्या घरीं येतो. तिचा पिता राजाचें स्वागत करतो ]

ललकारीः    अपरांताच्या महाराजांचा जयजयकार !

पिताः    यावें महाराज यावें.
कां गरिबाचें स्मरण अचानक आज बरें व्हावें ?
संकोचाविण, उपचाराविण मनोगत कथावें.
सेवेचें या प्रजाजनाला भाग्य मिळूं द्यावें.

राजाः वादळ झालें नाव उलटली वार्ता कानीं आली
नवलाखाचीं माणिकमोतीं रसातळाला गेलीं.
तव कन्येचा होता प्रियकर म्हणती त्यांतिल एक
असा कसा हा लिहिला होता ललाटावरी लेख ?

पिता : वरियलें आहे मनानें लग्न नाहीं जाहलें
मानुनी सौभाग्य त्याला चित्त आहे अर्पिलें.

ध्यास रात्रंदिवस त्याचा आणि आहे घेतला
तीन गेले दिन किनारा अजून नाहीं सोडला.

लोचनीं येऊन आशा पाहते क्षितिजाकडे
काय नावांचीं कुठें का पांढरीं दिसतीं शिडें ?

परत त्या वेडीस आणा समज कांहीं देऊन
आपला मानी नृपाळा, शब्द सारें कोंकण.

राजा : प्रेमाच्या प्रांतांत न कांहीं
राजाज्ञेला अर्थ मुळींही.
तिथें प्रतिष्ठा नाहीं मजला
अथवा माझ्या या शब्दाला.
पतिव्रतेचें मंगल दर्शन
घडेल मजला होइन पावन.

[ समुद्राच्या लाटांचा आवाज. राजा समुद्रावर येतो. ‘ कसें करूं मी तुझें सांतवन ’ या गाण्याचे सुर येतात. ]

प्रणाम हा घे तुला देवते !
महासती तूं अपरांतांतिल
पतिव्रतेची प्रीति अविचल
दिव्य, भव्य जें नरजन्मांतिल
तुझ्याच ठायीं मजला दिसतें !

धन्य पुरुष तो खरा
जयाला मिळे अशी अप्सरा !
देह लाभला लावण्याला
अर्थ मिळाला तारुण्याला
या मोहाचा मोह कुणाला
नवल न पडला जरा.

सखी : मैत्रिणी, नेत्र वळव गे जरा.
आले राजे कोंकणचे बघ तुला न्यावया घरा.
ऐकावें थोरांचे, अपुला हेका नाहीं बरा.

ती : कोण थोर या जगांत मजला विचार त्या सागरा.
कांहीं सांगूं नका कुणीहि, सारे मागें फिरा.

राजा (स्वगत) खिळून दृष्टी सौंदर्यावर
शाहरते कां मनांत हुरहुर ?
पावित्र्याच्या दर्शनमात्रें
रोमांचित कां होतीं गात्रें ?
मंत्रमूढ मी गेलों होउन
ओढ अनामिक राहे लागुन.

मन माझें नावरें
यौवनगंधावरी तरंगत अनिर्बंध संचरें.
नयनांची करितात असूया स्पर्श वनुन हावरे.
वाटे सांत्वनमिषें करावा स्पर्श कपोला करें.

चल सखि परत घराला

[ असें म्हणत राजा तिच्याजवळ जातो. तिच्या खांद्याला तो स्पर्श करणार इतक्यांत ढग कडतात, विजा चमकतात आणि ती अदृश्य होते. ]

इथेंच ना ती होती आतां ?
गेली कोठें बघतां बघतां ?
काय अचानक किमया झाली
दोन पावलें जातां जवळी
कोठें अंतर्धान पावली
सुरसरिता सोडून तृषार्ता ?

[ हळूहळू एक आर्तस्वर कानीं येऊं लागतो ]

निराकार स्वर कोठुन आला ?
तिच्याच हा तर कंठामधला
स्वरमय हें पाचारण मजला
तेजःकर ये उजळित ध्वांता !
बसुन स्वरांच्या तरंगावरी
लयललिता ही शिरे अंतरीं
मदनाच्या फुलवीत मंजिरी
अनुग्रहाची ही अभिनवता !

[ ज्या दिशेनें तो स्वर येतो त्या दिशेनें राजा चालूं लागतो. ]
दे दर्शन दे दर्शन
दे मजला जीवदान !
[ हा घोष करीत राजा चालतो आहे इतक्यांत- ]

आकाशवाणीः फिर मार्गे रे फिर राजा !
होतो आहे अविचार तुझा.

राजाः नाहीं आतां मार्गे फिरणें
तिच्याच मार्गे मार्गे जाणें
आणि तिला सर्वस्व वाहणें
जीवनास नच अर्थ दुजा.

आकाशवाणी: दैवत तें तर असे जागतें
आवर राजा अभिलाषेतें
कवळूं बघसी रे आगीतें
पसरुन दुबळ्या दोन भुजा.

राजा : कोणाची ही अभद्रवाणी ?
अवचित पडते माझ्या कानीं ?
मज रोधाया समर्थ कोणी
इथें न, पुरतें हें समजा.

आकाशवाणी: पंखांचें सामर्थ्य ओळखुन
पिसें असामान्याचें सोडुन
वनराईतच रंगव जीवन
ऐक जरा रे, ऐक द्विजा !

[ त्याच पूर्वीच्या स्वराच्या पार्श्वभूमीवर राजा 'दे दर्शन दे दर्शन' हा घोष करीत रानावनांतून भटकत आहे. श्वापदें गुरगुरत आहेत, रातकिडे किरकिरत आहेत, भालू रडत आहेत तरी राजा चालला आहे. ]

दे दर्शन दे दर्शन
दे मजला जीवदान.
तुडवित वन दाट दाट
ओलांडित बिकट घाट
करितांना पायपीट
आले कंठांत प्राण.

[ असा घोष करीत राजा चालला असतांना एकाएकी पक्ष्यांची किलबिल कानावर येते. पावा वाजूं लागतो. ]

किरण कपारीं कलते
कोणाची झुळुक तिथें
डोंगरांत मज दिसते ?
खासच हें मम निधान !
पायांनों, पवन बनुन
लवलाही मज नेउन
घडवा हो प्रियदर्शन
होऊं द्या मजसि धन्य !

[ राजा धांवतो. स्वर मोठा होत जातो. तिच्या भासाला तो मिठी मारतो. इतक्यांत विजा चमकतात, ढग गडगडतात, वादळ होतें. स्वर बंद होतो. ]

असा कसा मज संभ्रम झाला ?
आतां होती इथें उभी ती
मिठींत माझ्या आली होती
झाली इतक्यामध्यें शिळा ती
भासच अथवा होता सगळा ?

सांघिक भजनः एकवीरा एकवीरा
आदिशक्तिचा अष्टभुजेचा जयजयकार करा.
महासतीही शिवशक्ति आली अवतारा.

राजाः दे दर्शन दे दर्शन

घेऊनिया नादरूप

होतिस ना मज समीप

ओढवलें आज पाप

नादहि तो जाय विरुन

[ पुन्हा राजा रानींवनीं फिरूं लागतो. आतां स्वर नाहीं. त्याचा एकच आक्रोश चालू आहे–' दे दर्शन दे दर्शन ' समुद्रावर जाण्यापूर्वीं ज्या आमराईंत तिचा प्रियकर तिला भेटला होता त्या आमराईंत राजा येतो. कोकिळेचें कूजन कानावर येतें. ' थयथयथय कारंजें नाचतें मनाचें ' या गाण्याचे सूर कानावर येतात. ]

राजाः कुठून मत्त हा गंध उधळला ?

आम्रतरू चैत्रांत बहरले

त्यांनीं का वन गंधित झालें ?

छे छे गंधकणांतुन आलें

ईप्सित आमंत्रण हें मजला.

या गंधाच्या मार्गें जाउन

त्रिखंड हिंडुन आणिन मिळवुन

प्रेय मला जें गेलें सोडुन

हाच एकला ध्यास जिवाला.

दे दर्शन दे दर्शन...

निवेदक :
गंधरूप तत्प्रेय जाहलें
चित्त गंधमय होउन गेलें
जाणीव नुरे, नेणीव सरे
गंधामागें बेभान फिरे.
कोकणांत तो दिसेल राजा
अवचित आम्रातळीं बघा जा.
कोकणांतल्या सुना नि लेकी
ठाउक त्यांना एवढेंच कीं—

साधिक :
आंबा पिकतो, रस गळतो
कोंकणचा राजा झिम्मा खेळतो
झिम् पोरी झिम् । झिम् पोरी झिम्
झपूर्झा झपूर्झा......

# धन्य जाहलें माझें जगणें

धन्य जाहलें माझें जगणें !
अनामिकांच्या सामान्यांतुन
दिव्य-भव्य जें आलें उसळुन
दिपून गेलों आहे पाहुन
स्फुल्लिंगांचीं नभालिंगनें.

समक्ष घडले चमत्कार नव
दगडांतुन खड्गांचे आरव
भीरूंतुन अवतरले भैरव
वज्ररूप जाहलीं कंकणें.

काळ्या दगडावरलें शाश्वत
भाळींचें नियतीचें भाकित
पुसलें माझ्या डोळ्यादेखत
अटळाचें पाहियलें टळणें.

अधरावर निर्धार रोवुनी
सामर्थ्याची धडक देउनी
दिली, पाहिली मी, दुबळ्यांनीं
इतिहासाला वांछित वळणें.

वर्तमान रक्तानें शिंपुन
पिकवीलें यश, धालों पाहुन
जनता शृंगारली लेववुन
चिर स्फूर्तिचें अहेव लेणें.

उंच अहंकारांचीं माथीं
नाचत असतां त्यांच्यावरतीं
इवलालीं थयथय तृणपातीं
फिटलें माझें बघुन पारणें.

वर्तत असतां अभ्दुत असलें
आहे मी प्रत्यक्ष पाहिलें
यांतच सारें मला मिळालें
उलतें अंतर अभिमानानें.

# रेडा आणि ज्ञानेश्वर

येई न बोलतां मला घडघडा पाढा
म्हणतसां म्हणुन मज सदा माजला रेडा.
आहोंतच गुरुजी, मठ्ठड रेडे आम्ही
पण कां न एकदां व्हा ज्ञानेश्वर तुम्ही ?

# अंगाई

डोळेझाकी डोळेझाकी लवकर ये
गोड गोड नीज माझ्या बाळा लागूं

निंबोणीच्या झाडामधें लपून रे चांद
चांदण्याची जाळी येरे पाळण्याला बांध.

येग येग रातराणी घेऊन सुगंध
होऊं दे ग धुंद माझा आनंदाचा कंद.

हिरे आणा जलदेवी फोडून पाताळ
प्रकाशांत मंद त्यांच्या झोपेल ग बाळ

धरा हातीं तारकांनों स्वप्नांचे हिंदोल
आटपाट नगरींत जाऊं द्या नि झोल.

आळवी तूं निशादेवी अंगाईचें गान
गानीं लाभो राजसाला अमृताचें पान.

जोजवा खेळवा माझं वाढवा ग बाळ
हातीं माझ्या फुललेला गेंद द्या सकाळ.

# प्रबोधन

उठायाचं बरं आतां पुरे हं बाळ, अंगाई
नभीं बालार्क हीं आला दिशांना जिंकुनी दाही.
कळ्यांचे कालच्या झाले बघा हे गेंद रात्रींत
कळी माझी किती झाली बघूं उत्फुल्ल झोपेंत ?
तुम्हांला लौकरी मोठें असे ना व्हायचें बाळ ?
उठा पाहूं उठा आतां. कसें झोपून चालेल ?
नसे हो बाल्य या लोकीं गरीबांच्या मुलांसाठीं
जगीं येतांच कर्तव्यें तयांच्या लागती पाठीं.
दिसायाचें कसें तुम्हां असें राहून झोपेंत
किती ही आपुली आई श्रमें काबाडकष्टांत ?
तुम्हांवाचून का कोणी तिला द्याया असे धीर ?
कुणाच्या बाललीलांनीं तिचा हो कष्टनिर्हार ?
उठा हं बाळ, येऊं द्या जराशी कींव आईची
चला रांगा, हंसा, बोला फुलूं द्या बाग मोदाची.
बघा ही आणिली माझ्या कुणी ग जाग राजाला !
कुणी ? मी ? नाहिं ग बाई, न माया काय आईला ?
कशासाठीं वदूं खोटें दिला बाळास मी त्रास
निजा किंवा रहा जागे सदाचा हा तिचा जाच !

# भास्करा

जळे भास्करा, त्वत्तनू कल्प कोटी
तरी वाढती नित्य आहेच ज्योति.

तुझ्याशीं असे जोडिलें दीप्त नातें
क्षयाची न चंद्रापरी भीति मातें.

युगांचे किती खाक झाले निखारे
किती काळवंडून गेलेत तारे.

असे पेटतें कुंड मज्जीवनाचें
तरी तेज वर्धिष्णु आहे तयाचें.

# द्वंद्व

अशांत झालें शून्य अंतरीं
प्रस्फुरला ॐकार
जगाची ऋचा त्यांतुनी ये आकारुन
मंत्र झेलला सलील गर्भांतील कचानें
हुंकारत, हुंकारत
आकराच्या ऐलथडीवर
मातीच्या सत्यावर
अवतरलों, मी आलों, मी आलों.

आलेला बघुन मला
त्याच क्षणिं तूंही पण
तिमिरांतुन ठाकलास
सन्मुख, सन्निध, अमूर्त, अदृश.
भिडल्या नजरा परस्परांच्या
कडाडली शतकोटि वीज नभिं.
तिरस्कृतींतुन वैर निर्पजलें
आणि जुंपलें द्वंद्व अनंकुश,
चंड अखंडित.

बहुरंगी तूं, बहुरूपी तूं
जीवहनन तव जीवनहेतु.
कधीं हिमाचा,
कधीं जलाचा,
कधिं वन्हीचा

प्रभंजनाचा
महाव्यथेचा
वेष घेऊनी तुटून तूं पडलास मजवरी.

दुभंगून धरणीस
मला तूं, उघडिलेंस पाताळ, पुर
पडलें नाहीं तरि पदरीं यश.
जमविलेस समरोत्सुक चाकर–
प्रभुवर, प्रज्ञावंत, पुरंदर,
पुरुषोत्तम, भूपाल, धनंतर,
जहांगीर, उमराव, शिकंदर,
जागविला उरिं आसुर त्यांच्या,
अर्थाचा वेदान्त शिकविला,
स्वार्थाचा गुरुमंत्र पढविला,
दिली संमति स्वैराचारा.
भूगोलाचे करून वाटप
बांध, कवाडें, भिंती, अडसर,
उभारिले सर्वत्र तयांनीं
सभोंवार रोखिल्या संगिनी
केली माझी सबे होलपट.

झालों मी अनिकेत, दिगंबर.
गाठुन मज एकाकी, अगतिक
दिली आहुती वेदीवरती

आणि अर्पिला नैवेद्य तुला.
मांसाची लुसलुशीत कवळ्या,
रक्ताची ऊन्ह, ऊन्ह ताज्या
चटक जिभेची तरिही न तुझ्या गेली
चढला अधिकच अंगीं माज
आणि तूं मीमांसा ऐकविली मजला
"मरणं प्रकृतिः शरीरिणाम्"
भेडसाविलें तसेंच सांगुन-
'कृतांत, लोकांतक, अंतक मी.'

गेली अठ्ठावीस युगांच्या
मरून अतिपरिचयांत भीति.
जेव्हां माझी
पिरॅमीडच्या पायीं पिचली नळी-फासळी,
भिंत चीनची मापाया मम
उलगडला अत्रमाळ-गुंता,
गोल-बोल घुमटाचा जेव्हां
दगड तासला हाड-छिनीनें,
पराक्रमाचे,
स्वातंत्र्याचे,
स्तंभ, मनोरे,
अजस्त्र पुतळे,
चिरस्मारकें चढवित असतां ऊर तडकला.

यंत्राच्या चक्रावर चढला
पट्टा माझ्या चिवट त्वचेचा,
हिरोशिमाच्या कुंडामध्यें देह धडकला,
तुला तेधवां हर्षाचा उन्माद जाहला.
युगायुगांचा वैरी अपुला
गमलें, गेला रसातळाला.
दीर्घ काळ परि भ्रम न तुझा मी राहूं दिधला.
उधळित अडसर पुन्हा पुन्हा मी
ठोकरीत तुज खडा जाहलों समीप सन्निध.
कारण माझ्या अंतर्यामी
जगावयाची, जगवायाची उर्मी आहे,
स्वत्वाची मम वाणीमध्यें गुर्मी आहे,
नसांतून रग तारुण्याची उसळत आहे,
चिरवैराची धग नेत्रांतुन फुलते आहे.

पाण्यामध्यें चिमुट पिठाची
कालवून आईस लाविला
गोरस पाजावया जयाला
पेटविला पोटांत हुताशन
माझ्यामध्यें अश्वत्थामा
कारण तो अजरामर आहे.

तुझ्या मसलती, कपटयोजना,
गुहा, गव्हारें, वळणें, वाटा,

किल्ले, तट, छावण्या, शिबंदी,
कुठून केव्हां कसा घालिसी
छापा चोरुन, देसी हुलकावणी
पसरसी जाळें ध्याया भक्ष्य ओढूनी,
वेष कोणते, काय हिकमती,
कोण सोयरे, सेवक, साथी,
बलाबलाचें रहस्य, इंगित न्यूनांचें तव
झालें आहे ठाऊक मला
सारें कांहीं, सारें कांहीं !

करेन अथवा मरेन. छे छे,
केल्याविण मरणारच नाहीं.
पाहुन राहिन तुझाच शेवट
अडवुन वाटा,
रोखून खिंडीं
उभवुन मेढेकोट,
तोडुनी रसद तुझी मी
निरर्थ, निष्प्रभ, करून तुजला
शरण्य बनविन, भणंग याचक
सुक्या-शिळ्या-निःसत्व शितास्तव
लाचारीने वणवणणारा !

# अट्टाहास

होता अट्टाहास तुझा कीं
राहावें मी तुझ्याच अंकित.
होता अट्टाहासहि माझा
राहावें मी माझ्या अंकित.

कर्तुमकर्तुम् शक्तिमान तूं
आज्ञेंत तुझ्या ईश्वर राहे,
धर्मानें चढविलीं चिलखतें,
कलाकार करि तुझाच गौरव,
वेदान्ती करिती यशचिंतन
शास्त्रें होतीं चरणीं तव रत.

निराधार, निःशस्त्र, अकिंचन
अशक्त, मी यःकश्चित् पामर
कुडींत माझ्या प्राणज्योति
विझू विझू करितसे प्रतिपळीं.
नित्य तरी तुज आठव माझा
आणि भयाकुल तूं जन्माचा.
भीतीच्या गर्भांत होतसे हिंसेची धारणा
आणि मग अनिर्बंध संहारक तांडव
भ्यावें मी तृण दातिं धरावें,
लोटांगण पायावर घ्यावें,
म्हणुन सभोंतीं दलें अपरिमित,
शस्त्रास्त्रांचे प्रचंड पर्वत,

म्हणुन तापल्या सळया खुपसुन
डोळ्यांच्या करविल्यास खांचा,
रस कानीं ओतले
उखडली जीभ बंद करण्यास्तव वाचा,
हातपाय खांडून
फेंकिली बांधुन माझी मोट सागरीं,
टाकुन तेलामधें उकळत्या
कढ्यावरून लोटलें खालतो,
भिंतीमध्यें चिणून
सोलून देहावरची त्वचा काढिली,
तुरुगांत जन्मांत उभ्या नच
रविकिरणांची तिरिप दाविली.
क्रूसावर ठोकून खिळ्यांनीं
प्रेत सडविलें तिठ्यातिठ्यावर,
फांसावर टांगलें
विजेच्या खुर्चीवरती अग्निसमाधी.
छाती माझी भक्ष्य जाहली
भाले, बंदुक, रणगाड्यांची,
अण्वस्त्रांचे लक्ष्य जाहली
मस्तकांतली कवटी माझी.
आणलीस तूं नवीं अरिष्टें
त्यांत उपजलीं नव धारिष्टयें.
अजून नाहीं विझून गेली
विझू विझू करणारी ज्योति.

सत्य युगांतिल तोच अजुन तूं
कलियुगांतही तोच अजुन तूं
सत्य युगांतिल तोच अजुन मी
कलियुगांतही तोच अजुन मी.
अजून अट्टाहास तुझा कीं
राहावें मी तुझ्याच अंकित.
माझा अट्टाहास आणि कीं
राहावें मी माझ्या अंकित !

# राजा श्रियाळ

[ अतिथीच्या इच्छाभोजनासाठीं स्वतःच्या एकुलत्या एक मुलाचा बळी देणाऱ्या राजा श्रियाळाची कथा ही भारतांत घरोघर परिचयाची आहे. ती भक्तीनं ऐकिली जाते. सहजच हात तिला जोडले जातात. भारतीयांच्या श्रद्धा-जीवनाचें तें एक लेणं बनलें आहे.

चिलया, प्रल्हाद, ध्रुव, दत्त इत्यादींच्या कथा निर्मिल्या गेल्या, प्रिय झाल्या, त्या त्यांतील उदात्त आशयामुळें. परंतु काळाच्या ओघांत त्या आशयां-तील खरा व्यापक आशय विरघळत गेला आणि या कथांना भोळ्या भाविकांचें समाधानस्थान एवढेंच अर्थशून्य स्थान उरलें. पण आजचा काळ अशा कथांतील खरा आशय जाणण्याचा, सांस्कृतिक वारसा तपासून पाहण्याचा व नव्या संस्कृतींत तो सहज गोंवण्याचा आहे. या दृष्टीनेंच हा एक नम्र प्रयत्न आहे त्यांत मूळ कथानकांत यत्किंचितहि बदल करण्यांत आलेला नाहीं. रूढ कथेंतील आशय अर्धवट जाणला जातो तो मूळचा काय असावा, काय असला पाहिजे हें जाणण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुराणान्तर्गत अलौकिक पुण्यात्म्यांच्या जीवनांत परमेश्वर कोठें अतिथि, कोठें विठू महार अशा मानवी स्वरुपांत अवतरला, तो कसली कसोटी पाहण्यासाठीं ? त्याला सत्त्वाची परीक्षा घ्यावयाची होती कीं सत् तत्त्वाची प्रस्थापना करावयाची होती ? या दृष्टीनें वाचक व श्रोते या कथेचें वाचन व श्रवण करतील अशी आशा आहे. ]

दासी शशिकला :

अशी ग कशी
बाई तूं पिशी
फिरतेस लंकेची
पार्वती जशी ?
आज बाई घरांत

राज दरबारांत
आनंद गंध
घमघमे धुंद.
वंशाच्या वेलीस
लागे नव वरीस.
जसं कांहीं कांहीं
गांवींच नाहीं !
देवाला जाऊन
दर्शन घेऊन
आले पहा राजे
संगें बाळराजे.
हातभर कंकण
पायांत पैंजण
भरजरी साडी
हिऱ्यांची कुडी
फुलंबिलं माळून
ये कीं जरा नटुन.

चांगुणाबाई ! चांगुणाबाई ! तुम्ही तर बाई बाळाच्या आई !
झाली आहे सारी दिव्याची तयारी.
टिळा भाळीं लावा, ओवाळा दिवा.

[ ललकारी : औदार्यमूर्ति, त्रैलोक्यकीर्ति, अतिथिकामकल्पद्रुम सकलगुणालंकृत, सूर्यकुलावतंस, राजाधिराज श्रियाळ महाराज ! ]

चांगुणा : होय, शशिकले !

[ चिलयासह श्रियाळ प्रवेश करतो. राजा सिंहासनावर बसतो. चिलयाला चौरंगावर बसवितात. चांगुणा त्याला दिवा ओवाळते. ]

2051 ... 201

चिरंजीव व्हा बाळ !
आयुष्याचें तुमच्या राहो निरभ्र हें आभाळ !
वाढदिवस हा दिन भाग्याचा
धन्य जाहला कुसवा माझा
वाहुं लागला वात्सल्याचा
स्रोत घरांत खळाळ !
हार घालिते प्रेमाश्रूंचा
टिळा लाविते मांगल्याचा
आशिवापासून युवराजांचा
करावया सांभाळ.
नीरांजन मी ओवाळीतें
तेजाची ही उटी लाविते
आशीर्वच कुंडलें चढविते
अजिंक्य व्हा महिपाल !

99063

श्रियाळ : घाला ही युवराज पित्याची भेट वैजयंतीमाला

वसंतक : असो संमती इतरां, नृपवर उपायनें अर्पायाला.

श्रियाळ : वसंतका, मान्यता कशाला हवी आमुची त्यासाठीं ?
होऊं द्या प्रारंभ यथाक्रम देण्या आलेल्या भेटी.

शशिकला : आले सदरीं प्रतिभाशाली महाराज, कविराज कुणी
उपायनें कवितेचीं म्हणतीं अर्पुं इच्छितों नृपचरणीं.

वसंतक : असतिल प्रतिभावंत कांतिनगरींत शशिकले, लाख कवी
नृपनिष्ठा परि कविराजांची ज्ञात व्हावया प्रथम हवी.

श्रियाळ : अरे अरेरे, कविराजांना तिष्ठविलें कोणी सदरीं ?
जा जा जा या घेउन त्यांना सत्वर जाउन सामोरी.

[ वसंतक वगैरे जातात आणि कवीला घेऊन येतात. ]

कवि : वंदन वंदन रसिकराजवर !

श्रियाळ : या कविराज महाभाग !
तिष्ठावें दारांत लागलें
मानुं नका बरं का राग !
सुनवा, सुनवा कविवर, अपुली
नवी कोणती ती कविता
अधीर ती ऐकाया आम्ही
नको उगाच उशीर अतां.

कवि : कृपाप्रसादें पावन झालों,
धालों पाहुन रसिकपण
किंकर मी, विनवितों प्रभू, घ्या
गोड उपायन मानून.

श्रियाळ राजाचें गावें कीर्तिगान
जीवन हें व्हावें आणि धन्य धन्य !
श्रियाळांच्या दारीं आलेला याचक
गेला नाहीं केव्हां होऊन विन्मुख
याच प्रतिज्ञेचा जीवनाला ध्यास
हीच श्रियाळांची भूक आणि प्यास !

वसंतक : तिळमात्र उणिं न पतिहुनि
धर्म पालनीं, चांगुणाराणी
कविराज, तयांना जाल चुकुन विसरुनी.

कवि :

विसराया कवि नच मंद
जिचा गुणगंध करि जगा धुंद
राणीचा आहे पुढ अनुष्टुभ् छंद.

वसंतक :

आल्याच चांगुणा राणी, त्यांचिया कानिं
पडूंद्या गाणीं
जाउंद्या भरून दशदिशा स्तुतिस्तोत्रांनीं.

चांगुणा :

नकोत निराळीं माझ्यासाठीं गाणीं
राजांच्या कथेंत अंतर्भूत राणी.
जाया ही केवळ छाया प्रकाशाची
पतिजीवनाच्या पूर्ति समस्येची !
जाऊं द्या तें, नसे वेळ ही गाण्याची
झाली दुपारची वेळ भोजनाची.
पक्वान्नें खाउन पवाड्याची, बोला
भागेल कुणाची मध्यान्हाची वेळा ?

वसंतक :

चांगुणा राणी, चांगुणा राणी
यशः श्रवणाची रुची न भोजनीं.
घडविती कवी काव्याचा किरीट
काय त्याच्यापुढें मिष्टान्नाचा थाट ?
काव्यकिरीटाची करावया सरी
नाहीं महाराणी, लेणें भूमीवरी.
राजांच्या कीर्तीची ऐकतांना गाणीं
प्रजेलाही होतें नको अन्नपाणी.

चांगुणा : थांबू द्या जरा कीं पवाडे नि गाणीं
उपाशी पोटीं ये प्रज्ञेलाही ग्लानी
पात्रें सिद्ध झालीं, विलंब कशाला
चलायचं बरं आतां भोजनाला

श्रियाळ : कविराज, तुष्टलों आम्हि यशोगीतानें
सेवून तुष्ट व्हा, चला, तुम्ही मिष्टान्नें.

( सर्वजण भोजनगृहीं जातात )
( पानावर बसतांना )

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञ भाविताः
तैर्दत्तान प्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः
भुञ्जन्ते ते त्वघं पापाः येपचन्त्यात्मकारणात्
अन्नाच्या रूपांत मजपुढें उभें ब्रह्म नित्य
प्रसन्न तें जोंवरी दारचा अतिथी संतुष्ट.

मातृदेवो भव
पितृदेवो भव
आचार्य देवो भव
अतिथि देवो भव ।

दासी : ( प्रवेश करून ) महाराज, दारीं उपाशी अतिथि
श्रियाळ : कांतिनगरींत उपाशी अतिथि ?
बोलवा होऊं द्या त्याचो क्षुधाशांति.
घातल्या अजून नाहीं चित्राहुती.

चांगुणा : सांगते घ्यावया आणि एक ताट
जेवेल अतिथी आपुल्या पंक्तींत.

श्रियाळ :	छे छे हवें मीच कराया स्वागत
अतिथी केवळ परमेश्वर मूर्त !

( अतिथि येतो. खडावांचा आवाज )

यावें महाराज, पाद प्रक्षाळावे
आहे सर्व सिद्धि; भोजना बसावें.

अतिथि :	इच्छाभोजन देसि याचका ही राजा तव कीर्ति.
श्रियाळ :	बोलावें महाराज, आपुली करीन इच्छापूर्ती
अतिथि :	इच्छाभोजन काय एवढें सोपें गमे नृपाळा ?
श्रियाळ :	कधीं न लांछन उणेपणाचें शिवलें या श्रियाळा.
अतिथि :	नच नेम तयांचा कोण काय मागेल !
श्रियाळ :	राज्यांत न माझ्या कांहींही दुर्मिळ !

अतिथि :	वैभवास तव नाहीं तुलना
गेले जेवुन आणिक होउन भाट तुझे रे दाहि दिशांना.
कळली नाहीं दानक्षमता तुझी परंतु नीट तयांना.
महति श्रियाळाची नाहीं कळून आली अजून कोणा.
खरा तुझ्या दरबारीं नाहीं आला याचक करित याचना.

श्रियाळ :	इच्छाभोजनाचे अनंत प्रकार
अनंत याचकां देत आला आहे
राजा हा श्रियाळ !
असूंद्या विश्वास, होईल मनीषा
आपुलीही पूर्ण.

अतिथि :	शंका येते राजा तरी वारंवार
म्हणून म्हणतों, पुन्हां एकवार
करून विचार दे मला होकार.

श्रियाळ :　　कोठवर देवा, थट्टा करणार ?

अतिथि :　　पुरे न केवळ होकार असा तुझा गृहस्थाचा
समजावुनही हवा घ्यावया विचार गृहिणीचा.

श्रियाळ :　　महासति मम आहे जाया !
पावलावरी पतिच्या टाकित
पाउल आली इथवर चालत
जिला न पतिविण दुसरें दैवत
अशी असे ती मम पडछाया !
नका मानसी होऊं शंकित
माझे सारें तिजला संमत
कळुं द्या मजला अपुलें वांछित
आतुर आम्ही तें पुरवाया.

अतिथि :　　वाटतें करावें
आज राजा, मला अ-नित्य-सेवन
पाहावें करून अभक्ष्य भक्षण
जावें जेवून निषिद्ध भोजन.

श्रियाळ :　　अतिथीनें मन मोकळें करावें
आणि श्रियाळानें कोड पुरवावे.

अतिथि :　　इच्छा गेली आहे, आज राजा माझी मांसाशनावर.

श्रियाळ :　　हवेत एवढे कशाला त्यासाठीं आढेवेढे फार ?
नांव घ्या पशूचें, पक्ष्याचें, मत्स्याचें.

अतिथि :　　हवें राजा, मला रांधून वाढाया आज नरमांस.

श्रियाळ	दुर्मिळ वाटलें काय नरमांस अतिथिदेवांना ?

अतिथि :	सुळाची पायरी चढणारा हेर
राजद्रोही, खुनी आणशील कोणी !
नाहीं मी राक्षस किंवा हिंस्र प्राणी !

श्रियाळ :	जाणतों जाणतों अतिथिदेवा,
कळूं द्या कोणता नरदेह हवा ?
नाहीं प्रत्यवाय राजा श्रियाळाच्या येथील स्वामित्वा.
राजनिष्ठा हेंच जियेचें श्रेष्ठ
श्रियाळाची आहे प्रजा अशी श्रेष्ठ.

अतिथि :	नको मला राजा प्रजेचा हपाप
हवें मज अन्न संपूर्ण अश्राप.

चांगुणा :	आहे जीव माझा द्यावया मी सिद्ध.

अतिथि :	बोलूं नको कांहीं असें असंबद्ध !
अतिथीला जिनें वाढावीं इष्टान्नें
क्षुधा मी तिच्या का भागवूं मांसानें ?
गृहीणीच्या पश्चात् नाहीं विधुराला
यायचा गृहस्थधर्म पाळायला.

श्रियाळ :	काय आहे मनीं सांगा तरी देवा ?
कशाला एवढा व्यर्थ वाद हवा'

अतिथि :	सर्वाधिकारी, सर्व शक्तिमान्, संपत्तिमान्
राजाधिराजा !
बालकाचें मांस रांधून भोजना—

चांगुणा : ऐका या वेडीचें
भलतीं सलतीं देऊन वचनें घ्या न प्राण कुणाचे.
घ्या न शिरावर नाथ, ओढवुन पातक शिशुहत्येचें,
ज्याचें त्याला जिवलग चिमणें, अपुलें हृदय पित्याचें.

श्रियाळ : अर्भकाचा देवा, तुम्हांपुढें काय करावा मी केवा ?

अतिथि: अनाथ अपंग भिकारी पोराचें नको मला मांस.

श्रियाळ: सांगावया हें कां हवें श्रियाळास ?

अतिथि: कधीं कुळाला शिवलें नाहीं दैन्य जयाच्या
करी असूया सौंदर्याची मदन जयाच्या–

श्रियाळ: बोला देवा नांव कुळाचें, नांव मुलाच

अतिथि: हवा मला घास राजकुमाराचा—

१ ली दासी: राजकुमाराचा ?

२ री दासी: युवराजांचा ?

३ री दासी: बाळ राजांचा ?

४ थी दासी: कांतिनगरींत एकच आहे राजघराणें !

५ वी दासी: आणि त्यांतहि एकच आहे राजकुमार !

अतिथी: एकच कशानें ?

१ ली दासी: एकच, देवा !

२ री दासी: श्रियाळ राजाचा

३ री दासी: नव्या नवसाचा

४ थी दासी: एकुलता एक

५ वी दासी: चिलया बाळ !

चांगुणा: वाचवा हो बाळ !
संसाराच्या स्वप्नावरती
नका धरूं हो मशाल जळती
ओता वैभव पायावरती
करा हवें तर राज्य बहाल.

खुशाल जा मम प्राण घेउनी
मरुंद्या मज परि आई म्हणुनी
करिन इथें अदृश्य राहुनी
बाळाचा मी मम प्रतिपाळ.

( अतिथीला उद्देशून- )
काय तरी देवा, काय हें मागतां
अजाण तान्ह्याचा जीव कां हो घेतां ?
काय दुष्ट कृत्य घडलें म्हणून
आईच्या ओढीतां बाळ कुशींतून ?
असेन मी पापी, करा माझा नाश.
करूं मी द्यायची नाहीं बाळा स्पर्श.
देव माझा बाळ, धर्म माझा तोच !
अन्य कां थोतांड सांगतां उगाच ?

श्रियाळः अतिथीची इच्छा हवीच पुरवायला
घेतसों न आम्ही परत दिल्या वचनाला.

( चांगुणा किंकाळी फोडते. दासदासींची ओरड. )

दासीः जिव्हालोलुप कोण कोठला अतिथी दारीं आला
हवे तयाचे कोड कशाला इतके पुरवायला
मागायाचें तर मागावें धरून जनरीतीला
हा कुठला ग आज राक्षसी याचक दारीं आला !

अतिथीः काय माझी ही नृपाळा चालविली मस्करी ?
बोलणीं हीं कां तरी ?
मान्य राजा आश्रितांची ही तुला वाचळतां
म्हणुन कां ही मूकता ?

दानधर्माचें हवें लटकें कशाला पालन ?
यांत कांहिं न भूषण !
पाश मायेचे कुणाला नाहिं आले तोडतां
रे अहंता ही वृथा !

वृद्धदासी: मन अपुलें आवरा नृपवरा !
दानाचा हा सोस अघोरी
नाहिं कधीं अतिरेक बरा.
पुण्याईची काय तिजोरी
भरितां अपुल्या बाल जिवावरी
पापच येइल अंतीं पदरीं
विचार थोडा करा जरा.

श्रियाळ : क्षमा असावी अतिथि देवा,
वदल्या दासी अभद्र कांहीं
माया-मोहें रडली आई मानुं नका कांहीं.
[ चांगुणा हुंदके देते ]
अज्ञ बालका परी हुंदके काय महाराणी देतां ?
उजळ आमुची कीर्ति ठेवणें असे तुम्हां हातीं आता.
तुम्हा जाणत्या, नलगे देण्या तुम्हांस कर्तव्यस्मरण
श्रियाळपत्निप्रति साजेसें हवें कराया आचरण.
कुणी धरावी नश्वर मानुष देहाची या आसक्ति
चिरंजीव मनुजाचा होतो यशोदेह केवळ जगतीं.
[ चांगुणा हुंदके देते ]
उगी, चांगुणे, वेळ काय ही वेडे शोकाची ?
वेळ श्रियाळाच्या आहे सत्त्वपरीक्षेची.
इच्छा भोजन अतिथीला नच दिलें श्रियाळानें

होइल ह्याचा सर्व नाश गे या अपकीर्तीनें.
आवर अश्रू, आचर अपुला पतिव्रता धर्म
चल रांधाया अपत्य हांसत होशिल चिरनाम.

चांगुणा : जाणतें मी धर्म माझा.
पतिव्रता मी आहे अपुली
तशीच बाळाची हि माउली,
तुम्ही राजे माझे, तो ही बाळ जिवाचा राजा.
पिंड जिनें नउमास वाहिला
नख बाळाच्या काय गळ्याला.
धजेल कधितरि लावायाला हात कुण्या आईचा !

श्रियाळ : जिंकावे जेव्हां मोहाचे क्षण
तेव्हांच लोकीं लाभे थोरपण.
गृहीणीपदाचा साधाया गौरव
माराया पाहिजे मनाचें मार्दव.
ऊठ जीविताच्या साफल्यासाठीं
ऊठ चांगुणे, ऊठ माझ्यासाठीं.

चांगुणा : शिरसावंद्य आज्ञा नाथ, व्हा निर्धास्त !
आर्यस्त्रीचें आहे माझें पातिव्रत्य.

दासी : चांगुणाराणी, चांगुणाराणी !
असें हो कसें पेटलें पाणी ?
आईचे रोमांच झाले बाण-भाले
आसवांचे झाले तप्त लोहगोळे !
तान्ह्यासाठीं स्तनीं विष ओसंडलें
स्पर्शांत आईच्या खड्ग सज्ज झालें !

जन्मदात्री माता कशी झाली कृत्या ?
मायाच कराया कशी लागे हत्या ?

दासी : मनाचें मरण पाहवेना राणी,
डोळ्याचें तुमच्या कोठें गेलें पाणी ?
येऊं द्या आईचा येऊं द्या उमाळा
मायेची पांखर घाला तान्ह्या बाळा.

श्रियाळ : बंद व्हावया हवेत सारे प्रलाप तात्काळ
नच दुःखाचा
असे परी हा दिन भाग्याचा
दिन सोन्याचा.
करूं द्या निर्वेध महाराणींना धर्माचरण.

उगवला भाग्याचा दिवस !
लागायाचा आज असे कस माझ्या सोन्यास.

कुणी आजवर मागायाला
इच्छा भोजन जें नच धजला
तें मागाया आज पातला
अतिथी सदरेस.

दानाच्या मम परंपरेला
चढावयाचा आज उजाळा
सार्थकता यायची आजला
असे जीवितास.

अतिथीः करावयाचें आहे ज्याच्या देहाचें दान
आहे त्याला काय नृपाळा, दान तुझें मान्य ?

श्रियाळ : शुक्रशोणितसंभवःपुत्रः मातापितृनिमित्तकः
तस्य प्रदानविक्रयत्यागेषु मातापितरौ प्रभवतः
ज्या राजानें कधिं न धाडिला अतिथी अतृप्त
नसानसांतुन तदीय वाहे चिलयाच्या रक्त.
कसा आगळा असेल त्याचा मानस मजहून ?
विचारणें होकार तयाचा यांत न सुज्ञपण.

( अंतर्गृहांतून हुंदके येतात )

अतिथि : आलें नयनीं जर का पाणी
कष्ट जाहले अंतःकरणीं
सत्त्व आपुलें बसाल हरुनी
ठेवा हें ध्यानीं.
( अंतर्गृहांतून )

चांगुणा : बाळा चिमण्या गुणवंता, कांडितसे तुज माता.
अतिथिधर्मरत तव तात
त्यांचे व्हाया वच सार्थ
तुझा होतसे देहान्त
मोक्ष कोणता या परता ?
तव रक्ताच्या तैलांत
अखंड राहिल प्रज्वलित
निष्ठांची अमुच्या ज्योत
तारिलेंस कुल कुलवन्ता ?

वृद्धदासी : पाहुन ज्याला काळाचेंहि मन जावें विरघळुन
काय मिळालें त्या बाळाला नेउन आई पुढुन ?
जगावेगळी ही हिंसेची काय तऱ्हा तरि बाई
हिंसेच्या या भेसुरतेला तोड त्रिखंडीं नाहीं !

अतिथि : तोड त्रिखंडीं नाहीं [ हंसतो ]
दिसली वृद्धे तव चक्षूंना शरीरहत्त्या ही यःकश्चिन.
व्यर्थ जाहलिस वृद्ध एवढी !
या हत्त्येसम शत हत्त्यांना लाजविणारी
महाभयंकर झाली आहे येथें हत्त्या !
खड्ग चाललें आईवरती, मेली आई.
झाली हिंसा मातृमनाची.
स्त्रीचें हळवें कसें तुझें मन तेव्हां नाहीं थरारलें गे ?
त्याची ही वा झाली होती अशीच हिंसा ?
हिंसा होते प्रथम मनाची
बळी शरीरें पडतीं मागुन.
वेल उखडली आणि मागुती फूलहि पडलें
गळून भूवर.
एकच दिसली या बाळाची हिंसा तुजला ?
क्षणाक्षणाला नेती ओढुन मानव बाळें घराघरांतून
दैन्यशरीरीं बकासुराच्या आतिथ्यास्तव.
समोर आहे अखंड चालू मेध नराचा,
सत् तत्त्वांचा, माणुसकीचा
स्थंडिलावरी कधिं लोभाच्या, कधिं दंभाच्या,
कधीं यशाच्या, अहंपणाच्या, प्रतिष्ठेचिया !
एक तरी या
असंख्यांतला
दिसला होता
काय बळी तुज ?
असे निघालों
हिंसेचे मी
शोधित मूळ नि कूळ जगांतिल.

श्रियाळ :	अतिथिदेवा पाद प्रक्षाळावे
झाली पाकसिद्धि, भोजना बसावें.

अतिथी :	झाली पाकसिद्धि ? झालास धन्य ?
झालें समाधान ?
मिळाला आनंद धर्मपालनाचा ?

करुन अखरीं बसलासच ना तूं निःसंतान ?
अहंपणानें पुत्राचाही घेतलास प्राण ?
निरपराध निष्पाप जिवाचें देतांना उदक
तुझें पित्याचें हृदय द्रवलें नाहीं निमिषैक !
केली नाहिंस क्षिति मातेच्या लवही मायेची
लाविलीस तूं तिला कराया हत्या पुत्राची
झाली इतकी पुरे जाहली माझी पत्रास
गेहीं या अपवित्र तुझ्या मज नको नको घास.

श्रियाळ :	अतिथिदेवा नका असे हो झिडकारूं आम्हां
तुमच्यासाठीं केली आम्ही त्यागाची सीमा.

अतिथि:	माझ्यासाठीं ? छे छे ! राजा, आत्मवंचना ही
भोगानें तव बळि घेतांना पुत्र जाणला नाहीं.
समाधान तुज हवें नृपाळा धर्मपालनाचें
म्हणुन आचमन सांगसि घ्याया मज शिशुरक्ताचें !
रक्तपिपासा तुझी पाहुनी थरारलों मीच
निपुत्रिकाचें जीवन तुजला हवा शाप हाच.

श्रियाळ :	कोसळलें ब्रह्माण्ड जाहला पुरापुरा घात
तुष्ट न झाला श्रियाळाच्या हाय घरीं पांथ !

वृद्ध दासी: पुत्रहि गेला, पुण्यहि गेलें, गेलें सारें कांहीं
कशास देवा आतां मागें राहूं देतां आई ?
निरपराध जीवाचा केला ज्या आईनें घात
त्या आईला कसे ठेवतां देवा, अहो जिवंत ?
कठिण तुम्हां नच आणिक किंचित् असेंच निर्दय होणें
बाळा पाठोपाठ तयाच्या आईला पाठविणें.

अतिथि : आई ! ( हंसतो )
कधींच वृद्धे, बाळाचीं या मेलीं मातापितरें
फिरती त्याच्या अहंपणाचे देहरूप देव्हारे.

वृद्ध दासी : केला होता बाळजिवानें का अपराध कुणाचा ?
दंड तयाला केला म्हणुनी असला देहान्ताचा !

अतिथि ; हो वृद्धे, हो

वृद्ध दासी : काय प्रभुवरा ?

अतिथि कळतो मज संताप
पडला आहे बळी घरीं या एक जीव निष्पाप.

निष्पाप जीव !
झाली आहे खरी निष्पापाची हत्या.

होतां नये मुळीं,
होतां नये मुळीं निष्पापांची हत्त्या
कोठेंहि कोणत्याहि स्थंडिलावरी.
पडतां नये बळी,
पडतां नये बळी निष्पाप जिवांचा.

चिरडतां नये,
चिरडतां नये एकहि जीव
जूलूम, अन्याय, यांच्या दाढेखालीं
होतां नये हिंसा
होतां नये हिंसा चिलया बाळांची.

वृद्ध दासी : अतिथिदेवा !

अतिथि : त्यांच्याचसाठीं
लागे भूलोकीं अवतरावें मला- शिवाला !

वृद्ध दासी : आईला देणार काय मग बाळ तिचा परत ?
देवा गंगाधरा, आपुल्या शिरीं सुधास्रोत !

अतिथि : नाहीं गे मरण
निष्पाप जीवांना !
केली श्रियाळानें
क्रूर, अधम, अमानुष ही अतीव हिंसा आत्मघातकी.
मेला चिलया श्रियाळात्मज.
शुभंकराच्या जटेमधुन या अखंड वाहे अमृत गंगा
निष्पापांच्या संजीवनास्तव.
नवीन बालक
नवीन चिलया येईल जन्मा
—नाहीं श्रियाळाचा-
मृत्युंजयाचा
ठेवा मानवाचा, अनंत काळाचा
चिलयाबाळ !
चिलया-
चिलया-

ये धांवत ये धांवत ये चिलयाबाळा !
स्थानबद्ध कर वेसण घालुनिया काळा !
कांडणांत गुदमरुनी
जे गेले मरुन कुणी
पाहुं दे तुझ्यांत तदुत्थान रे जगाला !
हिंसेवर मात करुन
अंकुरतें नवजीवन
ये शिकवण देत देत हीच हताशाला !

चिलया : ( दुडदुड धांवत येतो ) आई !

# दिवाळी

उजळ दीपमाला चल पातली दिवाळी
संहारी तम उरला भरून भोंवताली.
तिमिर दूर करण्यास्तव
विश्वाचा हो संभव
जीविताहि संभवता आणि त्याच वेळीं.
चंद्रतारका अनंत
कोटि तमोहर नभांत
पाजळून देहाच्या हिंडती मशाली.
कार्यास्तव या विराट
खद्योत द्युति संतत
आजीवन पाजळींत फिरत वनोमाळी.
उरला तरि बहिरंतर
दाटुन घनदाट तिमिर
ज्यांत अमित आजवरी जीवनें निमालीं.
धडपडतां अंधारीं
ये जीवा अंधेरी
कोण करिल तज्जीवित उजळुन गतिशाली ?
मृण्मय किति प्रतिवर्षीं
दीपगृहिं, आकाशीं
जळति परी नच सरली अजुन रात्र काळी.
देहांतिल कणकणांत
फुलव लाख लाख ज्योत
करि धवळुन आसमंत साजरी दिवाळी.

# करूंया नवीं जगें निर्माण

करूंया नवीं जगें निर्माण !
होऊं प्रलयंकर शिवशंकर
उघडूं तिसरा नेत्र सर्वहर
भुवनांचे मुळिं ही स्थिरजर्जर
नुरवूं नामनिशाण.
सुर-धवलारें करूं खालसा
आणि त्यासवें निरय नाहिंसा
तळलीं वरलीं भयें सर्वशः
करूं भस्म सत्राण.
पयस्तनीं आसवें लोचनीं
ही अबलेची करुण कहाणी
असे घडविली ज्या सबलांनीं,
दावुं तया निर्वाण.
दैन्य देउनी मानवतेला
जयें निर्मिलें वैषम्याला
चढवूं त्यांच्यावरती हल्ला
आणि करूं शिर्काण.
रूढ श्रद्धा, धर्म, संस्कृति
पाहूं जाळुन यांची माती
चेतवून विज्ञान ज्योति
सोन्याचें परिमाण.

नियतीचीं तडकवूं कपाळें
उखडुं दयेचीं पाळेंमूळें
बनवूं बंडच जीवन सगळें
आणि करूं गतिमान.

जीर्ण जगाच्या विध्वंसांतुन
जगतें उभवूं या चिरनूतन
विकास सुंदर जेथें जीवन
फुलविल प्रेमोद्यान.

# जरि असलें आव्हान महान्

जरि असलें आव्हान महान्
अमरत्वाचें तुज वरदान !
नष्ट कराया तुझें अमरपण
जन्माला येतसे क्षणोक्षण
परमाणूंच्या अळीअळींतून
अघोर हिंसेचें संतान.
जन्मान्तरिची आशा अधुरी
युगायुगांची धडपड अपुरी
निघालास तूं कराया पुरी
तुजवर खिळलें रे अवधान.
जठराग्नी ज्वालेंत पेटले
विश्व पेटवावया निघाले.
दिलें तयांनीं तुला आपुलें
त्वेषरूप अणुभंगज्ञान.
लोभाच्या भट्टींत जाळिले
मुके मुमुर्षु उभे सोलले
त्या जीवांनीं कवचकुंडलें
आशेचीं तुज केलीं दान.
खेडोखेडीं शेणी वेचित
व्यास वाल्मिकी मरती अगणित
अजिंक्यतेचीं तुझ्याच संतत
गातीं रामायणें महान्.

हंसल्या वाचुन जगले, मेले,
मरणाला अथवा जे हंसले
त्या सर्वांनीं असें चिंतिलें
        तुझें यशस्वी हें प्रस्थान.
भाषा वैदिक कधि वाण्याची
आणि भस्मली ज्वानी ज्यांची
जीवमती चाल त्या सतींचीं
        निश्वसितें मानून प्रमाण.
उकिरड्यावरी जीं अपरात्रीं
आयांनीं टाकिलीं कारटीं
तुझेंच रे पथगीत घोषती
        गुदमरलेले त्यांचे प्राण.
हालाहाल वा होउन वन्ही
विश्व गिळाया आलें धावुनि
तुला शिवायो शक्त न कोणी
        तुझाच विश्व जयाचा मान !

# कचरा

खोलिंत छोट्या
दाटिवाटिनें
रचिला आहे माझा मी संसार.

कसा तरी ? छे,
प्रमाण सुंदर, कसा व्यवस्थित
अडगळ किंवा कण केराचा
मला जराही चालत नाहीं.

ज्ञानोबासह बसे फळीवर
नीट घिटाईत
कवी आजचा जून कलंदर.

पहिल्या पानीं
पांच मुंडकीं
उडवुन त्यांचें उरल्या पानीं
रहस्य उकली
अशा कथांचा दलाल कोणी
विभावरीशीं चाटा मारित बसे ठाकठिक.

नव वर्षाला
नवीन येती भिंतीवरती
अनेक रंगी दिवस दर्शिका.
तळांत खालीं
दोन तसूंच्या चौकोनामधिं दिनांकदर्शन.
आणिक वरल्या दोन फुटांच्या चौकोनामधिं
जीवनदर्शन !
छटेल मोठी
विख्यात नटी
रंगित ओठीं चालु युगाचें हास्य ठोकबंद
करारांतल्या अटी बरहुकुम मादक, दाहक.
पटवी महिमा
केश विनाशक कधिं साबूचा,
वनस्पतीच्या कधीं तुपाचा,
खरजेवरल्या कधिं मलमाचा.

डोळा चुकवुन
कोपऱ्यांत वा मांडणीमधें
घरट्यासाठीं चिमण्या येती
घेउन चिंध्या कापुस, काथ्या.
परी लागतां मला सुगावा
क्षणांत देतों कचरा लोटुन.

सहलीसाठीं रजेंत गेलों
कांहिं दिवस मी
खिडक्या दारें, झडप, झरोके
बंद व्यवस्थित करुन एकदां.

परतल्यावरी
प्रथम पाहिलें दार उघडतां,
केर सांठला काय कुठें तें.
नव्हती कोठें घाण जळमटें.

भिंतीवरती
समोर होती प्रतिमा माझी
गेली तिकडे दृष्टी सहजीं.
प्रतिमे मागुन
गवत नि काड्या चिडवित होत्या मज डोकावुन
कचरा शी शी !

क्षणही पुरता जाउं न देतां
घेउन आलों काठी आंतुन
वर पाहियलें–
घरटें होतें पुरें बांधिलें
आणि तयाच्या तोंडावरती
उभ्या आपुल्या वासुन चोंची
चिंव चिंव टाहो फोडित होते
मांसल नाजुक चिमणे गोळे
आणि तयांना भरवित होती
आई तयांची घास कोंवळे.

माझ्यामधला
मला न कळतां
स्थिरला मानव त्या दृश्यावर
भुलला जीवन विलासावरी.
हात थांबला काठी वरला.

पाहुन माझी विचलित स्थिति
भिंतीवरती झाली चुळबुळ
झालो फडफड
दिवसदर्शिका आज्ञापिति मज—
" काय पाहसी ?
दे लोटुन तो कचरा सारा. "

# आड

आड होता एक मोठा जीर्ण सडके लागुन
गांव होता एक छोटा त्यास बसला बिलगुन.
पोसला होता तयानें गांव देऊन जीवन
रंगलें त्यागामधें समृद्ध त्याचें जीवन.
नाहला मध्यान्ह काळीं हेमवर्षावामधें
चंद्रिकेचीं रजतगीतें ऐकिलीं रात्रीं मुदें.
पावसाच्या भेटल्या जेष्टांतल्या जेव्हां सरी
रसरसूनी यौवनाची ये नव्हाळी अंतरीं
नाद नवथर बिल्वरांचे बोकलावर जाहले
अंग मेघश्याम त्याचें तेधवां रोमांचलें.
तेथ केव्हां नववधू निर्माल्य येती सोडुन
तीं उरीं मांगल्य चिन्हें वागवावीं हर्षुन.
खेळतांना बालकांनीं सहज टाकावे खडे
हास्य वत्सल खिदळुनी वर आणि यावे बुडबुडे.
जाहली होती खडी घोडी तिथें संताजिची
भागविली वीरमय होऊन पय तृष्णा तिची.
वैष्णवांचे थांबले होते तिथें जेव्हां जथे
क्षाळुनी तच्चरण दिधलीं त्यांस सौहार्दामृतें.
भरभरूनी देत होता जीवनाच्या कावडी
सफलतेच्या सौरभाची लूट चाले हरघडी.

वाजली कोठावरी एकेदिनीं जड पाउलें
ओठ होते दाबले अन् श्वास होते रोधिले.
वरून आला एक गोळा आणि धब्कन् वाजला
भीतिनें दचकून झाला आड तो हिरवानिळा.
तोंच पाठोपाठ धप् धप् चार गोळे धडकले
आणि कोणीसे कुणाला पुढुन मागें खेंचले.
" जाउंद्या, मरुं द्या मला, व्हा चालते सारे तुम्ही
नाहिंतर गाडीन या आडांत साऱ्यांनाच मी
दाखवाया मज नको तुम्ही दयेचें नाटक
या जगाचें सत्य आहे पूर्ण मजला ठाउक.
मेजवान्या मृत्युच्या निर्वेध चालाव्या इथें
याचसाठीं न्यायखातीं आणि हातीं बाग्नटें.
घेतली काढून शक्ती माणसें जगवायची
घातली अंगीं तिच्या जागीं अशी मारायची
आठ दिवसांचीं उपाशी देत होतीं आचके
त्याचवेळेला कुठें होतात गेलां नेमके?
पोटचे गोळे जयानें जीव घेउन मारले
काय त्याला जगविण्याचे यत्न तुमचे चालले?"
ओरडा त्याचा मनावर घेतला नाहीं कुणी
घेउनी गेले तयाला दंड त्याचे बांधुनी.

हा भुतांचा आड यानें पांच गिळिलीं सानुलीं
ऐकुनी ही लोकवाणी होय त्याची काहली.
आड तो ओसाड झाला राहिली नच वर्दळ
माजलें शेवाळ सोडी श्वास दुर्गंधी जळ.
डोकवाया सूर्यचंद्रा तेथ बंदी जाहली,
घायपाती, धोतरा, घाणेर, झुडुपें माजलीं.

बाह्य विश्वाच्या न याव्या चाहुली कानावर
कीटकांची तीच ती म्हणुनी त्रिकाळीं किरकिर.
साप काळे, धामणी, फुरशी तिथें फूत्कारती
आणि त्या आडांत जहरी गरळ संतत ओकती.
टाकिती रात्रीं अनिच्छित संतती अबला तिथें
भंगलेली प्रीत केव्हां प्रेत होउन पोहते.
कनक किंवा कामिनीचा लोभ वेडा होउन
खांडुनी नवतीस नकळत तेथ बुडवी आणुन.
काळरात्रीं बेत काळे चालती कांठावर
ऐकुनी कांटा न आतां शाहरे अंगावर.
अशिव विश्वांतील सारें अंतरीं सामावुन
गणित दुःसह जीवनाचे आपुल्या दीर्घ क्षण—
आड आहे एक मोठा जीर्ण सडकेलागुन
गांव आहे एक छोटा त्यास बसला बिलगुन.

## हींच तीं पाउलें

हींच तीं पाउलें
डोळे वाटेकडे जयांच्या युगानुयुग लाविले !
ज्यांच्या युगचाहुली लागतां
शिरिं माझ्या भेदरली सत्ता
जड्देहीं रोमांच प्रथमतः
या मम मोहरले.
शोधित अवघड पाउल वाटा
अवजड साखळदंड ओढितां
सुजलीं, सुकलीं जीं पडझडतां
रुतुन विखारी सलें.
उन्हांत ज्यांची लाही फुटली
पावसांत टरबुजें अलगलीं
हिमांत पिचलीं, तमांत दुबलीं
वाहुन रक्त निळें.
पायाळूंचीं हींच पदें तीं
भूजलगर्भांतील दौलती
दिव्य दृष्टी लाभुन होती
गोचर ज्यांच्यामुळें.
चढाव पैजारांचीं नामें
जयांस केवळ आकाशसुमें
कातडिचे आपुल्या रुजामे
परार्थ अंथरले.

मथुरेच्या घोषांत चाहुली
आल्या लंघुन विंध्य अरवली
ऐकुन आनंदलीं, नाचलीं
सह्याचल जंगलें.
गोफ्यामध्यें गेंडा काळा,
त्यांत साविका मोरपिसाला
तोडुन असला साज आपुला
जगन्नाथ चालले.
प्रदीर्घ दुःसह जिणें शिलेचें
कंठियलें मी वंदिस्ताचें
मुक्त कराया मला प्रभूचें
शुभागमन जाहलें.

# रे करांनो माझिया

रे करांनो माझिया
ग्रंथ कष्टाचा युगांच्या मूर्त रूपें तुमचिया.
यौवनाची रग कशानें लोपली भर यौवनीं
अवकळा काळीनिळी ये कांतिला कवळेपणीं
भेटली चिंधी न केव्हां स्पर्शला फुटका मणी
राजबिंड्यांनो, दशा हो जाहली रे कासया ?
झिजुन तुम्ही चंदनासम निर्मिली धनदौलत
कालवे सौख्यामृताचे खेळवीले अगणित
मूर्तवीलीं भूवरीं सौंदर्यस्वप्नें अद्भुत
परि न त्यांच्या संनिधीं तुम्हां मुभा फिरकावया !
खणुन खाणी– कालव्याघ्राचीं गव्हारें फोडुनी
खवळलेल्या सागराच्या मगरदाढा उखडुनी
काढिलीं रत्नें दिलीं तुम्ही दिशांना उधळुनी
कण नखाग्रीं नच तयांचा राहिला पाहावया.
लाडक्यांनो योग हा निष्कामकर्माचा पुरे
व्हा जरा कीं लौकिकांतिल षड्रिपुकारी पामरें
सोडवुन समृद्धतेला स्वगृहीं आणा बरें
एकदां व्हा नटुन नटवर योगियांच्या राजया !
आजवरच्या या अभावाचें करा उद्यापन
कोणतें हो दुर्लभांतिल ल्याल दुर्लभ भूषण ?
छे, नको संदेह, आतुर राहिलीसे होउन
राजमुद्रा अंगुलीवर तुमचिया विलसावया !

# आला सौदागर सौदागर

आला सौदागर सौदागर.
काढा अडगळ जुनी पुराणी
चीजा हो या नव्या घेउनी
जोडा धन भागवा अडचणी
पटवुनिया व्यवहार भराभर.
यौवन पडद्यांतील कुणाचें
तान्हें नवसा सायासाचें
जा ठरवा जा मोल तयांचें
येतिल दाणे मूठ मूठभर.
जीव जिवाचा अंश शिवाचा
आहे का मोडींत द्यायचा ?
पटवा सौदा किफायतीचा
सोळा रुपयासह कुडत्यावर.
किसान, कामकऱ्यांनो या ना,
कशास आशा करिता नाना ?
देउन जीवन सुदैव माना
कोर कोर जरि आली भाकर.
स्फुरण अद्भुत दिव्य तरलतर
प्रतिभे घेउन चल पेढीवर
सार्थ व्हावया हवींत तीं जर
मोल मागुनी घे टक्क्यावर.

द्वैतात्म्याचीं मंगल लेणीं
भूमाता सौभाग्यशालिनी
गहाण ठेवुन आणा बांधुनि
शस्त्रांचे चलनांचे डोंगर.

अपूर्व साक्षात्कार प्रीतिचा
परमानंदहि साफल्याचा
देहिं याच जर जोडायाचा
चढवा जीवन तर कोर्दीवर !

# अश्रुंनो व्हा चलते

अश्रुंनो, व्हा चालत
कढ, उमाळे, हुंदके पत्रास यांची ना इथे !

स्वल्पही दुःखें दिलाला माझिया पडलीं घरें
आपदांच्या मग्रुरीला आसवांचीं उत्तरें
गुंफुनी शब्दांत आसूं निर्मिलीं सारस्वतें.

आपदा धांवून येतां मान खालीं घातली
स्वैर नाचाया शिरीं त्यांना मुभा सारी दिली
चेव ये त्यांना दुणा हीं भोगतांना स्वागतें.

वाकुनी गेला कणा ये अंतराला दीनता,
जाहली लाचार वाणी, लोचनीं ये भीरुता,
सह्य शक्ती बघुन धालीं देव आणिक दैवतें.

आपदा नच, मानवांची ही अनौरस संतती
जाणिवेनें याच माझी संपली भीति, क्षिती.
काम वज्राचें कुठें का आंसवांनीं भागतें ?

आज पुसल्या ओघळांच्या सर्व ही खाणाखुणा
वालुकेची शुष्कता मी आणिली मल्लोचना
अंतराचें पाहुनी काठिण्य तीख हि लाजतें.

हात दुःखाशीं कराया दोन बाजो मी खडा
नाहिं पूर्वींचा जिवाणू दीन दुबळा भाबडा
आसवें नच, यापुढें नेत्रीं विजेचीं विलसितें.

## वजनयंत्र

फलाटावर स्तंभासमीप
होतं उभं एक वजनयंत्र
पाचारीत लोकां–' यारे सारे जन. '

खुराड्यांतून पक्षी प्रातःकाळीं जावे उडून
वाटसरू तेवीं थांबतां गाडी
चार दिशांना जाती निवून.
झाडून करावा साफसूफ मार्ग
फलाटावरील तेवीं उतारू
जाइ घेऊन लोकल गाडी मधून मधून.
जाई एखादी भरधाव गाडी
वाटे चालला अहंकार जणुं होऊन साकार !

चितारला होता फलाट सारा
रंगीबेरंगी चित्रफलकांनीं.
नव्हते तेथें जनजीवनाचे रोमांचपट,
स्मरकथा किंवा समरकथा,
नव्हतीं पुराणें, काव्यें, इतिहास,
अथवा चरित्रें चितारलेलीं,
नव्हत्या तेथें, वीरांच्या, कवींच्या,
कलावन्तांच्या, विज्ञानवेत्त्यांच्या
शिल्पप्रतिमा, छायाचित्रेंहि.

नव्हता किंवा कोठें अल्पही कलाविष्कार,
नव्हती तशी भवितव्याची
रेखाटली कोठें सोनेरी आशा,
नव्हती स्वप्नें नव्या जगाचीं.

गरम चहा पासून फायदे,
पहा नैनिताल, रामकुंड, देहू,
कोइमतुरी साड्या, पातळें, किंवा खंबायती,
फौलादी मुक्का, जुल्वेका नतीजा,
पेनकिलर, खासीखलास.
झाली जीवनाची बाजारपेठ
वेश्यागृहाची खिडकीच जणुं !

त्याच घोळक्यांत–
फलाटावर स्तंभासमीप
होतें उभें एक वजनयंत्र
पाचारीत लोकां– ' यारे सारे जन. '

फलाटावरून चालले होते अनंत जीव
अनंत विश्वें, अनंत सुखें, अनंत दुःखें
उरीं आणि शिरीं ओझीं वागवीत,
लहान, मोठे, श्रीमंत, गरीब, पुष्ट, रोगकृश,
मदिर लावण्य आणि मूर्त घृणा.

त्याच घोळक्यांत
चालला होता कोणी वाटसरू
होता आपल्याच दुःखांत चूर

रात्रंदिवस कारखान्यांत
तयें आजवर राबून संतत
बनविलीं होतीं अपार स्वहस्तें वजनयंत्रें.
पोटाची खळी भराया करणें
राबला, गेला उरीं फुटून
लाखों यंत्रांची उभवीत माया.
ग्रासला रोगानें-रोगराजानें.
फणफणला होता तापानें.
लागली होती ढास नि धाप.
नव्हतें त्राण उचलून पाय पुढें टाकायचें.
चालला होता हवा पालटाया
जीवनाशेनें मुलखाकडे
सोडून आपलें कार्याचें क्षेत्र
चांचपीत एक रेलची तिकटी
आणि आणेली खमिसांतली
उरलेली एक.
आला विचार-
पाहूं विचारून यंत्राप्रति या
देहसंपदेची शिल्लक आपुल्या.

फलाटावर स्तंभासमीप
होतें उभें एक वजनयंत्र
पाचारीत लोकां- ' यारे सारे जन.
नाहीं सान, थोर, श्रीमंत, गरीब,
पुरुष, महिला, सबळ, दुर्बळ,
वंश, धर्म, जाती, देश, गण, वेश,

रोगी, निरोगी, स्वकीय परका, यारे सारे जन.
तुमच्यासाठीं केल्या ठायीं ठायीं अशा सुखसोयी.
ठेविल्या होत्या का कधीं तुमच्या बापजाद्यांनीं
करून यापरी अपूर्व सोयी ?
घाट एखादा, विश्रामशाळा, किंवा पाणपोयी
एवढेंच होतें ठावें पूर्वजांना. '

होतें ओळखीचें यंत्र तयाच्या.
अमोल आपला जीवनरस
देऊन होता पोसला यंत्राचा
पिंडतयानें-
कामगारानें !
फिरला होता सर्वांगावर
हात तयाचा-
कामगाराचा !
फुलविली होती तया यंत्राची
अस्मिता त्यानेंच-
कामगारानेंच !
माझीच सृष्टि !
मीच प्राणदाता !
माझ्याच अंकित !
याच आशेनें, अभिमानानें
उभा एक क्षण होता समोर.
नव्हतें परी बोलाया राजी यंत्र तयाशीं.
कोठली मग भाषा सेवेची- कृतज्ञतेची ?
शुंभासारखें होतें थंडगार खडें समोर
वजन यंत्र.

माझीच निर्मिति मला परकी आणि पारखी!
चावी निकलची, सोन्या चांदीची,
कागदी नोटांची हवी लावाया
सुखाचीं दालनें
तेव्हांच होतीं खुलीं खाड् खाड्.
पसारा सृष्टीचा उभवून सारा
नामानिराळें ब्रह्म - कामगार!
यंत्रापाठीमागें अदृश्य हात
होता धन्याचा नच निर्मात्याचा.

खळकन् झाला अस्पष्ट आवाज
कुण्या गामाची?
कुण्या तन्वंगीची?
कुण्या कुबेराची?
तोडून मिठी
कडोसरीची सोडून ऊब
कोण आला हा आपुल्या वस्तींत?
–हीच होती पृच्छा
यंत्रोदरींच्या तळघराची.
'कणकणलें आहे अरेरे अंगज्वरानें'
क्षणभरच झाली कुजबूज आणि चुळबूळ.
क्षणार्धांतच गेला पार लया आपपर भाव
आण्यांत मिळाला एक नवा आणा
टोळीस मिळाला एक नवा साथी.

खिळवून दृष्टी लालकांच्यावर
एकाग्र चित्तें

होता कामगार जाणून घेत
देहसंपदेची शिल्लक आपुल्या
स्थिरच होता तरी शून्यावर
तांबडा कांटा.
नुरली जणुं जडता देहीं !

सोडून एक दीर्घ उसासा
उतरून खालीं गेला निघून
चांचपीत एक रेलची तिकटी
खमीसांतली.

फलाटावर
स्तंभासमीप
होतें उभें एक वजनयंत्र
पाचारीत लोकां– ' यारे सारे जन. '

# आपुलीं हांकारा तारवें

आपुलीं हांकरा तारवें
नवीं जगें शोधाया फिरती दर्यावर नाखवे !

जुना किनारा झाला नाहीं नजरेआड अजून
तोंच तराफे या तीराला ठेविलेत नांगरुन
समुद्र नच अद्याप एकही गेलों ओलांडून
कसें वाटलें तोंच, गवसलें खंड आपणां नवें ?

डोळयावर ओढून कातडें दूर सारली शींव
आणि झोंपडी मधील व्याकुळ चिमण्यांची चिंवचींव
काळाच्या जबड्यांत जाणतेंपणीं लोटला जीव
मच्छीमारीसाठीं तीरीं या थांबाया नव्हे !

खिळवा नजरा अढळ ध्रुवावर, धरा सुकाणू घट्ट,
शीड उभारा, गलबत घाला लाटेवरी विराट.
पुढें पुढें हा चकवा अपुला, अनंत अपुलें क्षेत्र
काळाच्या स्पर्धेत आपणां क्षणभर सोंस नवें !

# पाजळुं दीप अनन्त

पाजळुं दीप अनन्त
असंख्य दिव्यांतून रक्षिली हातीं ज्योत ज्वलंत.

स्वार तमावर होऊन वारा
आला धांवुन सौरावैरा
ज्योत तगविली तटवुन मारा
रचुन कोट जीवन्त

अमोल यौवनसुमनें फुलली
हांसत देह समर्पुन विरलीं
फुलेलांत त्यांच्याच ठेविली
आहे तेवत संथ.

पोलादी या अमुच्या हातीं
अमर राष्ट्राची आहे ज्योति
आल्या गेल्या काळ्या रात्रीं
नाहीं शिवली खंत.

तेजाशीं साधली दुष्मनी
पळतां त्यांना थोडी धरणी
नाहीं आतां नाशावाचुनी
उरला दुसरा पंथ.

सांदिकोपरे धुंडुन धुंडुन
जाळूं तम भवना भुवनांतुन
पणती एकन् एक चेतवुन
उजळूं दाहि दिगंत.

त्या तेजावर रम्य सुवर्णी
उठतिल सौंदर्यांचीं गाणीं
अनंत जीवन त्यांत रंगुनी
होईल श्रीमंत.

## हवन

घेणार किती हा होम अजुन आहुति ?
गोचर न जरी तरि घरोघरीं आहे ज्याची स्थिति.
पतिदेव कधींचा आहे जगिं कोपला
संतुष्ट कराया त्यास यज्ञ मांडला
संसार कशाचा हुताश हा धडकला
भस्मती होउनी हवन त्यांत हिमवती.
निटिलीं न कुंकु हें मळवट हा चर्चिला,
हातांत जखडिल्या वज्रचूड शृंखला,
छे मंगलसूत्र न पाश गळा अवळिला,
बांधून स्थंडिलाकडे बली वाहती.
झिंगविली पाजुन मोक्षकल्पनासुरा,
प्रीतीच्या सनया काढिति मधुर स्वरा,
मंत्रांत पोंचला सेवागौरव भरा,
बोहल्यावरी नच, चढे चितेवर सति.
रक्षणार्थ अबला पतिगृहीं पातली
नव नाम लाभतां सौभाग्यें वर्षलीं,
'तूं माझी' म्हणतां गालिं उषा अरुणली
कळली नच पडली कधिं व्यक्तित्वाहुति.
लाचारी म्हणजे विनयवती लाजरी
रंजनक्षमा जी रूपवती ती खरी.
सर्वस्व समर्पुन मिळवी घर भाकरी.
अव्यक्त ज्वलना नाहीं कां या मिति ?

# विषप्राशन

चला या हांसत होउं पुढें
करूं कालकूटाचे पिउनी रिते समस्त घडे !
हालाहल नच, ये चिरतृषितां
घेउन वार्तिक अमृतवार्ता
करुं जीवाचे कवाड आतां
स्वागतार्थ उघडे.
मानवताजप हृदीं चिरंतन
कंठांतच विष विसरे विषपण
ठावें आम्हां जहरामागुन
अमृत लाभ घडे.
आजवरी जें जीवनमन्थन
करीत आलों मरणें जिंकुन
उज्ज्वलता या महन्मृतींतुन
आज तयास चढे.
मरणारे मरतील विषानें
मृत्युंजय आम्ही न कशानें
नित्य मरूनहि अनंत मरणें
राहुं जिवंत खडे.
अखेरच्या या विषप्राशनें
असति व्हायचीं निर्विष भुवनें
सुधेचेंच मग देणें घेणें
उमाप चोंहिकडे.

## उंबरा

उंबरा चिमुकला स्थापियला दारांत
बसविला काय हा मायेचा विश्वस्त.
खेळवीत अंगाखांद्यावरतीं बाळें
अन् आकांक्षांचीं दावितसे आभाळें.
गृहलक्ष्मी करिते प्रवेश पतिच्या गेहीं
तत्पादस्पर्शें पुलकित काया होई.
पाहतो पिंजेरपालट मूक जिवांची
बरसाद साहतो आणिक विरहाश्रूंची.
ऐकतो निराश्रित कण्हणें बाहेरील
निर्घोर चेष्टितें सुखविनात आंतील.
संसारसौख्यधन सांठविलें गेहांत
रक्षणार्थ त्याच्या तक्षक हा दारांत.
पेटला भडाग्नी संसाराचा जेथ
आडोसा त्याच्या निर्वेध ज्वलनार्थ.
जीवनें धुमसतीं किती चार भितींत
दुःखास फोडिती वाचा नेत्र उशींत.
हं थांब समाजा, हा संरक्षित भाग
फिरकाय! येथें बंदी, येथुन नीघ.
पुरुषार्थी पाठीराखण धरूनी दार
बैसलें करित हें जागरूक सरकार.
धडपडे प्रीतिखग पाहाया आकाश
ही कुऱ्हाड त्याचा बंद कराया श्वास.

बेचिराख झाल्या स्वातंत्र्याच्या सेना
या गुलामगिरिच्या वेशीवर लढतांना.
मानवीजीवना दुभंगणारी रेषा.
येथेंच जन्मली सुखदुःखाची भाषा.
तट अभेद्य किंवा हा संस्कृतिदुर्गाचा
या भिंती आडुन बचाव जर्जरतेचा.
झगमगती वरती वाडे विभवश्रीचे
कोलीत जळे पायांत असंतोषाचें.
उन्मत्त अरीचें येथें मर्मस्थान
मानवा, तुझ्या हें सामर्थ्या आव्हान !

# टाळें लोखंडी

पाखंडीत आग
देशादेशावर सत्ता उन्मत्त
करीत चालली होती आगेकूच.
पतंगापरी निघत होते भाजून जीव,
पाचोळ्यापरी मालमत्तासारी जात वाऱ्यावरी,
एकच चालली होती पळापळ दसाहतीची,
जीव घेऊन पळत होती दूर निवाऱ्याला मनुष्यवस्ती
झळ येथेंहि यदाकदाचित् पोंचेल म्हणून.

नित्य बोलक्या नगराची आतां बसली वाचा.
बाजारहाट शुकशुकाट
माळरानेंच निष्पर्ण निर्वात !
खुपसून शिरें गगनाच्या पोटीं होते जे मिनार
शिल्पकलेची, कलाकौशल्याची, आजवर जीं
होतीं क्रीडास्थानें झालीं थंडगार.

हिंडत होते अधून मधून जीव निराश्रित,
गांदी गिरणींत खपत होते पोटासाठीं जे,
उष्ट्याशितासाठीं वणवण जयां
करावयाची होती दारोंदारीं,
नव्हते जयांचे इमले महाल,
नव्हती कोठें ही सत्ता काडीमात्र

पदपथावर होता ज्यांचा थाटला संसार,
आपलें घर, आपला गांव, आपली मायभू
सारें कांहीं होतें ज्यांचें टीचभर पोटीं सामावलें,
नव्हते ज्यांना करावयाचें रक्षण आपुलें
अथवा आपल्या मालमत्तेचें.

निपचित होतें पडलें रात्रीचें भेसूर प्रेत,
स्मशानीं ऐशा निर्मनुष्यशा
घराच्या एका पायरीवरी
पडला होता कुणी पामर
देत विश्रांती देहा आपुल्या
देह कशाचा !
बांधली त्वचेच्या पटकुरामध्यें मोळी हाडांची !

होता पाठीशीं उभा बंगला
अवकाश सारा होता जेथील आसुसलेला
कवटाळावया मानवबाळां,
पांखर पंखांची घालावयाला
होती जेथील जाहली अधीर वास्तुपक्षीण.
गिर्द्या मखमली, आसनें मृदुल, पंखे विजेचे
सांगत होते–
‘ घेइ मानवा, सेवा आमची ’.
परंतु होता तिष्ठतमध्यें भव्य दरवाजा
आणि तयावर लटकत होतें टाळें लोखंडी
सांगत पांथस्था–
‘ आहे का ठाऊक
गेले असती धनी घराचे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99963



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५६६५८ दि. २।०२४

गाजवावया शौर्य समरीं
टाकून निर्धास्त घर आपलें अंगावर माझ्या ?
राखणदार मी निष्ठावंत !
होती वर्दळ गृहीं ज्या काळीं
सहाय्या मम होती शूर सेना तदा श्वानांची.

इमानी सेवक !
केलीं जयांचीं घर धन्यांनीं आवडी हौशीनें
बाळंतपणें, पुजल्या पांचव्या, केलीं बारशीं,
घातलीं खाऊं पंच पक्वान्नें.
गेली असे आज सेना ती सारी मालकासवें.
उरलों असे मीच एकटा.
समजूं नका यःकश्चित् यंत्र.
भणंग, भिकारी, बेकार, मवाली, दीनदरिद्री,
भुरटे, चोरटे येवोत कोणीहि
असे समर्थ मी सकलांचा घ्याया परामर्श.
शक्ति माझ्याठायीं असे महान् सांठविलेली.
शूर सैनिकांचीं अनंत दलें,
अघोर अस्त्रांचीं अमित आगरें
खडी आहेत वाट पाहात शद्बाची माझ्या.

करून पाहा स्पर्श मम देहा !
विरोधकांना तुडवीत आहे टांचाखालतीं
करून काळाशीं तह दोस्तीचा.
नात्या गोत्याची,
ऋणानुबंधाची,
प्रेम प्रीतीची,
माणुसकीची क्षिति न मला.

जाणतों केवळ कर्तव्य पालन.
माझ्या अभावीं नाहीं चालायचें जग सुरळीत.
होईल सारा सांवळा गोंधळ,
होतील सारेच मालक नि स्वामी.
उरणार नाहीं कोणीच सेवक.
प्रभाव बुद्धीचा, क्रीडा कलेची,
धांव विज्ञानाची मिळेल सार्‍यांना पूर्णविराम. '

इवल्या मूर्तीची ऐकून महति
अस्वस्थतेनें विचलित झाली नीज तयाची.
तोंच जाहलें रोदन सुरू उंच आवाजांत
सूचना होती ती हवाई हल्ल्याची.
पळूं लागले उरले सुरले सारेच लोक.
तोच काय तो थंडपणें होता उभा एकाजागीं
टेकून दाराला.

करून अस्त्रांचा अग्निवर्षाव
गेलीं उडून हवाई जहाजें.
तरंगत होतें थारोळीं रक्ताच्या
कलेवर एक पायरी खालीं छिन्नविच्छिन्न
आणि दारावर लटकत होतें
टाळें लोखंडी.

# वसुन विमानांत १

वसुन विमानांत
पहा निघाला पर्यटनाला मनुज अनंतांत !
विमान नेता विहंगमांचा
सीमोल्लंघन हाच जयाचा
असे जीवनक्रम नित्याचा
बला न ज्याच्या तुला मिळाली अजुन दिगंतांत !
मिळतां असलें अपूर्व वाहन
हर्ष नराचा ये ओसंडुन
म्हणे, करूं या अनंतमंथन
अगम्य रत्नें आणूं यत्नें सकल भौतिकांत.
मृत्युभयाचे भुजंग फोडुन
अवकाशान्तर टाकूं भेदुन
तट शून्याचे येऊं लंघुन
करूं मनींची युगायुगांची जिज्ञासा तृप्त.
ग्रहगोलांच्या शिलोच्चयांवर
रविचंद्राच्या सरस्तटांवर
चंचल विद्युत्द्रुमशाखेवर
वसुन विसांवा घेऊं केव्हां घडिभर मार्गांत.
अज्ञाताच्या खणुनी खाणी
अमरत्वाचीं घडवूं लेणीं
मानवतेच्या वाहूं चरणीं
सुधातरंगिणि अलौकिकांतुनि उतरवुं लोकांत.

काळोखाचीं लंघूं क्षितिजें
हुडकूं तेजाचीं साम्राज्यें
स्थापूं तेथें मानुषराज्यें
करूं अगोचर दृष्टिपथीं स्थिर मग अधिकारांत.
प्रीतिगुणाचा वेढुन फेरा
ब्रह्माण्डाचा घुमवुं भोंवरा
मानवजन्मा घालुं ईश्वरा
जगदुत्पत्ति स्थितिलयशक्ति घेऊं स्वकरांत.
घेऊं परतत्वें तळहातीं
चैतन्याच्या फुलवूं ज्योती
विज्ञानाची विमानमूर्ति
प्रसन्न जोंवर कांहिं न तोंवर अशक्य विश्वांत !

## बसुन विमानांत २

बसुन विमानांत
पहा निघाला पर्यटनाला मनुज अनंतांत !
विमान नेता विहंगमांचा
सीमोल्लंघन हाच जयाचा
असे जीवनक्रम नित्याचा
बला न ज्याच्या तुला मिळाली अजुन दिगंतांत !
मिळतां असलें अपूर्व वाहन
हर्ष नराचा ये ओसंडुन
बोले आतां करूं अचेतन
गड दुर्गांचा, बाहुबलाचा प्रभाव समरांत.
नवीं नवीं शोधुन हत्यारें
बनवुं नभाचीं शस्त्रागारें
शिरीं संथवुन दलें अपारें
सीमातिक्रम विना अभिक्रम करूं दऱ्यांत.
दिसतां वर शिर विरोधकाचें
ओतूं वरूनी रस आगीचे
उठवूं झंजावात विषांचे
जिंकुन अपुले करूं भूवरले नवे नवे प्रांत.
संहाराची विराटशक्ति
विमानरूपें आली हातीं
सहज करूं ही निर्वीर्य क्षिति
अस्मदिच्छया चालवुं जगिं या जीवन जीवान्त.

शांतिस्तव ही मानवजाती
अधीर झाली पृथ्वीपृष्ठीं
रणें रंगवूं तिच्याचसाठीं
भूगोलावर करूं शांति स्थिर मग अधिकारांत.
ग्रहगोलांवर चढवूं स्वारी
होऊं तेथिल सत्ताधारी
साम्राज्याविण अपुल्या दुसरो
क्षणहि न देऊं सीमा राहूं अखंड विश्वांत.
करूं स्वसत्ताकांक्षापूर्ति
अनन्य होउन विश्वाधिपति
विज्ञानाची विमानमूर्ति
प्रसन्न जोंवर कांहिं न तोंवर अशक्य विश्वांत !

# भूक

अंगार कशाचा हा उसळे ?
गोजिरवाणीं पिलें चिमुकलीं
रानीं वाघिण घालित गेली
येतां मागें आग पेटली
मायेचे करि भस्म मळे !
जाती भस्मीभूत होउनी
किती पिंड, अर्भकें प्रतिदिनीं
हाडें कंटक तशा हिमानी,
आगीला घरदार मिळे.
होते पामर जगवीत कुडी
नीतीच्या झोपडींत उघडी
झळा लागतां तुरुंग दगडी
आश्रयार्थ भरणें पडलें !

दहनभयें या घरें त्यागिलीं,
शीलाचीं कुंपणें तुडविलीं,
काया उघड्यावर अंथरली
परि न तेथ ही दाह टळे.
धर्मनीतिचे बालेकिल्ले,
निष्ठेचे ध्वज बुरुजावरले
आणि कलांचे कितीक इमले
रक्षारूप जगीं उरले.

दगड पेटतां पाया मधले
सांम्राज्यांचे घुमट तडकले
तक्तांचे ही तडे उडाले
धूम्रवलयिं नृपती विरले !
दाह हीच तर तनु तेजाची,
आग तशी ही चिज्ज्योतीची,
पेट घेऊनी कधीं कशाची
करील रांगोळी न कळे !
नेम न, केव्हां कालापोटीं
ज्वाला या उठवितील मोठी
अनंतांत विकाळ आगटी
जाळित जगत्पतंगकुळें !

## अस्थिदेह *

येथ उभा कोणाचा अस्थिदेह हा ?
कोणाचा भग्नजीवनावशेष हा ?
अंतिं ज्या लाभतसे चंदनी चिता
त्यांचे का अस्थिदेह येति मिळवितां ?
स्निग्धजनीं जो फुलांत जीव राखिला
हातीं का कोणा तद्देह लागला ?
यत्नखाग्र ही न परें पाहिलें कुणी
प्राणान्तीं येत काय तो प्रदर्शनीं ?
लाभला न कोणी ज्या आपुला असा
उरला नच कोणीही ज्यास वारसा,
कष्टुन ही अनशन ज्या जीवनीं सदा
अस्थि हीच झाली यद्देहसंपदा,
निर्धनता हीच जातगोत नी कुळी
आकाशें केली ज्यावरति साउली
त्याचा हा येथ उभा अस्थिपंजर
ज्ञानदान करण्यास्तव जीवनोत्तर !
प्राणान्तीं आज सुखें येति चालुनी
काचेचें गेह दक्ष नित्य रक्षणीं.
उदर रितें होतें हें जवळ जोंवरी
केलें नच कोणीही जवळ तोंवरी.
पोटाची देणार न करुन जाण ती
जगताच्या प्रेमा नच तोंवरी तुटी.

वणवणला अन्नास्तव दशदिशांवरी
जाळियला देह क्षुद्दाहकान्तरीं
उरलें नच देहीं मग उदर तें कुठें
लाभतसे म्हणुन थोर आसरा इथें.
देहाचें ज्ञान करुन घ्यावयाप्रती
आयुर्विद्यार्थिवृन्द जमत भोंवती.
एक एक बघती हे अस्थि निरखुनी
वळविला न नेत्र हि ज्यावर जितेपणीं.
रोगांचें शतसहस्र ज्ञान मिळवुनी
भिषगभिज्ञ झटतिल हे जीवरक्षणीं.
रोग रित्या उदराचा का कधीं परी
त्या कळेल अस्थिमात्र देह जो करी ?
जगतिं असे जीव क्षुद्रोग-जर्जर
तत्प्रतीक येथ खडें हें खरोखर !

* ( रुग्णालयामध्यें मांडून ठेवलेला हाडांचा सांपळा )

# नंगा पर्वतावर मोहीम

नंगा पर्वत !
पर्वतापरी स्थूल नि उंच देखोनी रूप
ठेविसी मानवा, नांव पर्वताचें
आणि धरिसी ईर्षा गांठण्याची शिखर ह्याचें
आहे का ठावें परी तुजला सत्यरूप माझें ?
वेळींच घेई जाणूनी तया
देई सोडून बापुड्या यत्ना;
व्यर्थ व्यर्थ रे मुकशील जीवा !
जाई परतून जाई मानवा !

नंगा पर्वत !
पर्वत न हा,
अवकाशाच्या अनंतोदधीची अनंत वाट
चालली कापीत अजस्र नौका वसुंधरेची
अजस्र तिची ही असे डोलकाठी !
पाहा जराशी उंचावून मान
दिसतें का कोठें शिखर तियेचें
गेलें आरपार भेदूनिया जें अंतराळासी.
हलत्या डुलत्या नौकापृष्ठावरी
धडपणें या येत न मनुजा उभें राहाया
कशी धरावी हांव तयानें

डोलकाठीवर चढावयाची ?
व्यर्थ व्यर्थ रे मुकशील जीवा !
जाई परतून जाई मानवा !

नंगा पर्वत !
पर्वत न हा,
असे निसर्गाच्या सम्राटाचें हें राजमंदिर.
पहुडला असे राजराजेश्वर
पांघरूनिया शुभ्रवस्त्रें,
वर्षें, शतकें, युगानुयुगें
कैक आजवर गेलीं निघून
अभंग आहे निद्रा तरी ही.
जाणून दरारा धजलें नाहीं फिरकावया
दूरवरहि आसमंतात् चिटपांखरू.
नको तयांच्या निद्राभंगाचा ओढवूं राग.
खडा पाहरा नित्य जागता
असे सभोंती हैम कड्यांचा,
खंदक असती हिम नद्यांचे ठिकठिकाणीं,
चुरून लीलेनें देतील न राहूं
मागमूस ही तव देहाचा.
व्यर्थ व्यर्थ रे मुकशील जीवा !
जाई परतून जाई मानवा !

नंगा पर्वत !
पर्वत न हा,
अजिंक्य, विराट निसर्ग-राजा !
पाहा अंतराळीं

तत्साम्राज्याचा रूपेरी ध्वज फडके अढळ.
स्पर्श न व्हावा त्यास अपवित्र मर्त्य जंतूंचा
गस्त घालती म्हणून येथें
पंचभूतांचीं अजस्र दळें
संहारशक्ति अणू अणूंतून
आहे संचरत जयांच्या ठायीं
झुंज तयांशीं कोणीं करावी ?
क्षुद्र, दुर्बळ नरकीटकें ?
व्यर्थ व्यर्थ रे मुकशील जीवा !
जाई परतून जाई मानवा !

मांसल स्नायूंचीं होतील लाकडें,
पोलादी हाडें जातील पिचून,
कोट छातीचा जाईल भंगून,
भेगाळून अंग होईल चाळण,
भेगाभेगांतून स्रवेल रक्त,
आंतबाहेर जाईल सारें गोठळून हिं,
खंबीर पाय होतील पांगळे,
व्याकूळ होतील भुकेनें प्राण
हिमशीलांशीं झुंजझुंजतां-
व्यर्थ व्यर्थ रे मुकशील जीवा,
जाई परतून जाई मानवा !

बरी नसे ही आक्रमणाची फाजील हाव.
माता पितरें, बहीण भाऊ, बायका मुलें,
रक्ताच्या ओढीचीं,
व्यक्तिजीवनाचीं

आल्हाद स्थानें !
समाज, देश, मानवजाति
स्वत्त्व विस्ताराचीं,
भव्य जीवनाचीं
विलास क्षेत्रें !
विविध सुखांचीं विलोभनीय हीं
अमित भांडारें
त्यागून सारीं काय साधाया आलास येथें ?
मानवी जगीं नसतीं काय
इतर क्षेत्रें पराक्रमाला ?
व्यर्थ व्यर्थ रे मुकशील जीवा !
जाईं परतून जाईं मानवा !

जायचें असें पर्वतवरा !
नच परतून परी पुढें पुढें.
कशास मजला वृथा घालिसी भीति नानापरी ?
डोलकाठीची गगन भेदिता,
निसर्गाधिपाचा धाकदरारा,
पंचभूतांची अजय्यशक्ति,
मज रोधाया कोणीहि यांत नच समर्थ.

नंगा पर्वत !
पर्वत ऐसे कैक असती अजून मानवा उल्लंघायचे.
विश्वाच्या पोटीं कैक असती अजून मानवा अज्ञात गोष्टी.
नसावें विश्वीं अज्ञात कांहीं
ह्याच आकांक्षेनें
भारला मानव निघाला बाहेर
सोडून आपलीं चिमुकलीं जगें.

अनंत मरणें लागोत मराया
पडणार नाहीं बांध तयाच्या महदाकांक्षेला.
महान् ध्येयें गाठतां गाठतां यावें मरण
काय यांत न व्यक्तिजीवन पावे सार्थकता ?
भंगुर जरी व्यक्तिजीवन
अमर तरी ही असे मानवता.
अखंड आहे जीवन उर्मे मरणामागें.

झुंजच जर खेळावयाची
कां न खेळावी महान् शत्रूशीं ?
निसर्गावरी आहे करायची मात मानवा.
होता आजवर बागुलबोवा.

' निसर्ग ! निसर्ग ! '
सारेच म्हणती,
' विराट शक्ति, अजिंक्य केवळ अनाकलनीय. '
नाहीं परंतु आज उरला आब तयाचा.
राबवीत आहे निसर्गाप्रती
आज मानव पावलों पावलीं.
स्वयंगतिका, जलतरंगिणी,
पाणबुड्या, यानें आकाश संचारी,
ध्वनियंत्रें, दृश्यक्षेपणें,
सांगतीं सारीं—

"नसे मानवा अजिंक्य कांहीं निसर्गांत या"
विजयाची नाहीं शंका स्वप्नींहि.
एक दिवस असे विजयाचा
निश्चित लिहिला भवितव्यांत.
व्यर्थ व्यर्थ रे तुझें हिमनगा, भेडसावणें.

नंगा पर्वत !
असे टेकडी परसांतली आम्हां मानवां.
हिम न येथें असती रचिले थर परांचे.
घातले कुंदाच्या सडे पुष्पांचे.
हिमवर्षाव सुमवर्षावच.
शीत हि येथील देईल ऊब.
सर्व प्राणवायु घेऊन ठेवूं देह जिवंत
आणि याच देहीं याच डोळां पाहूं
अज्ञात, अगम्य पर्वतशिखर.
नसे आकारांत,
नसे आयुधांत
सांठविलेलें सामर्थ्य बा रे !
ध्येयाच्या प्रीतींत आहे सारें बळ एकवटलेलें.
जाईल तयाच्या सामर्थ्यावरी
विविध साधनीं
मानवता ही
कापीत वाट दिक्कालाच्या
अनंततेची,
असीमतेची......

## गस्तवाले होशियार

रोज रात्रीं पायपीटी सारखी रस्त्यांतुनी
कीं निशाचर पशु वनीं.
भीतिची वा कडक थंडी पावसाळ्याची तमा
ठाउकी नाहीं तुम्हां.
सोडुनी घरदार रात्रीं पाडणें कर्तव्य पार.
गस्तवाले होशियार !

बांधुनी वाडे सभोंती कोट दगडांचे खडे
दार लोखंडी पुढें.
तळघरीं नटनाच करिती दौलती झंकारुनी
भव्य टाळीं लावुनी.
मोद लुटती रमण रमणी आणि प्रीतीचा अपार.
गस्तवाले होशियार !

याच वेळीं चोरचिलटें बेरडांचीं टोळकीं
लपत फिरती सारखी.
मालकां अस्तित्व त्यांचें कोण देइल जाणुनी
हो तुम्हाविण गर्जुनी ?
परधनाच्या रक्षणाचा मस्तकीं तुमच्याच भार
गस्तवाले होशियार !

झोंपडीला दार ना तन्खा तुम्हां अपुरा पडे
पोर अन्नार्थी रडे.

बायकोला धडुत नाहीं लाज राखाया धड
करिती मडकीं खडखड.
रोज रोखुन दार तुमचें बैसलासे सावकार.
गस्तवाले होशियार !

रोगराई गेहिं तुमच्या बैसली मांडून ठाण
आणि दुःखांची न वाण.
सान मोठ्या आपदा यांचीच ये जा संतत
हीच तुमची दौलत.
कोण हो या दौलतीस्तव गस्त तुमच्या घालणार ?
गस्तवाले होशियार !

अमित जनतेच्या तुम्हांसम कन्वटी नाहीं छदाम
वळचणीचें जीस धाम.
मांगवाडे अन् खुराडे कामगाराचें जिथें
शेतक्याचें खोपटें
गस्तवाले कां न फिरती बाजुला त्या एकबार ?
गस्तवाले होशियार !

ऐकुनीया गस्त जागे आणि पामर होतिल
साद तुम्हां देतील,
पाश दास्याचे धनाच्या खळखळा मग तोडुन
मुक्त होइल जीवन.
होउनीया सार्थ तुमची गस्त तेव्हां थांबणार !
गस्तवाले होशियार !

REFBK-0011973



REFBK-0011973

ग्रा. क्र. ११८६३

## चालला यज्ञ

चालला यज्ञ हा समोर जगडव्याळ
हो मंत्रध्वनिनें आभाळ हि वाचाळ.
कितीयेक दंगले समिधासंकलनांत,
हविदानस्पर्धामग्न अपरिमित हात.

ही धामधूम मी पाहतसे केव्हांचा
गलबले जीव हा होउन अगतिक माझा.
हवि अपुला अल्पस्वल्प तरी अर्पावा
येऊन मनीं हें सुचे न कांहीं जीवा.

पाऊल उचलतां होतो मज सायास
मी खिळलों आहें, वाटे मज, मातीस.
स्वस्थानीं बसतों सोडुन मग निश्वास
चिंतीत सांगता क्षणोक्षणीं यज्ञास.

केलें न शुभेच्छेवीण जयांनीं कांहीं
कांहींच तयांना समाधान का नाहीं ?

## आशीर्वाद

[illegible]

प्रल्हाद केशव अत्रे

[illegible]

मुखपृष्ठ छपाई–अरुणोदय छापखाना, ठाणें.